रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक १९० | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल
रायगड, मंगळवार, दि. १६ डिसेंबर २०२५
किंमत ४ ₹

## वाहनाच्या धडकेत विद्यार्थिनीचा मृत्यू

**पनवेल :** पेट्रोल भरण्यास स्कूटी ढकलत घेऊन जात असताना भरधाव वाहनाने दिलेल्या धडकेत विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून एक तरुणी जखमी झाली आहे. साक्षी पाटील (१५) असे मृत तरुणीचे नाव असून कृतिका भगत (१५) असे जखमी तरूणीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, साक्षी पाटील ही पेट्रोल भरण्यासाठी एक्टिवा स्कुटी ढकलत घेऊन जात होती. दरम्यान, जेएनपीएवरून येणाऱ्या सेवा रस्त्यावर कुंडेवहाळ येथे त्या आल्या असता भरधाव वाहनाने साक्षी पाटील आणि मैत्रीण कृतिका भगत यांना धडक दिली. या धडकेत साक्षीचा मृत्यू झाला.

विकणे आहे
पोयनाड (ता. अलिबाग)
एस.टी. बस थांब्यापासून
५ मिनीटाच्या अंतरावर
1 BHK Flat 635 Sqft.
Cont. 8425054720




# तलाठी, सर्कलचा कामांवर बहिष्कार

■ ऑनलाईन काम बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद

■ शासकीय कामांवर परिणाम

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

ऑनलाईन कामांसाठी असलेली उपकरणे जीर्ण झाली आहेत. त्या ऐवजी नवीन लॅपटॉप, प्रिंटर कम स्कॅनर देण्याची मागणी अनेक वेळा शासनाकडे करण्यात आली आहे. मात्र, शासनाकडून त्याची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या जिल्ह्यातील तलाठी (ग्राम महसूल अधिकारी) व मंडळ अधिकारी यांनी एकत्र येऊन सोमवारी (दि.१५) ऑनलाईन कामांवर बहिष्कार टाकला. जिल्हाधिकारी कार्यालयासह उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसील कार्यालयासमोर निर्देशने करून जीर्ण उपकरणे (डिजीटल सिग्नेचर

•> पान २ वर



"नवीन लॅपटॉप व स्कॅनर प्रिंटर मिळावेत, अशी शासन स्तरावर बऱ्याच दिवसांपासूनची मागणी आहे. परंतु, शासन याला गांभीर्याने घेत नसल्याने सोमवारपासून महाराष्ट्र राज्य तलाठी संघाच्यावतीने राज्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी ऑनलाईन कामकाजावर बहिष्कार टाकत डिएससी मशीन जमा केली. आंदोलनाला जिल्ह्यात शंभर टक्के प्रतिसाद मिळाला आहे."

– संजय शिंगे, रायगड जिल्हा तलाठी संघ

### ऑनलाईन कामांवर परिणाम

रायगड जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी सोमवारपासून ऑनलाईन कामकाजावर बहिष्कार टाकला. हे काम बंद ठेवण्यात आले आहे. त्यामुळे ई पिक पाहणी, ई हक्क ई पंचनामाा, फेरफार, सातबारा आदी ऑनलाईन कामांवर त्याचा परिणाम झाल्याची माहिती समोर आली आहे. या आंदोलनामुळे सर्वसामान्यांची ऑनलाईन कामे ठप्प झाली आहेत.

## बाप लेकाचा अंदाधुंद गोळीबार

**| सिडनी | वृत्तसंस्था |**

ऑस्ट्रेलियातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील बोंडी बीचवर रविवारी (दि.१४) संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास बाप लेकाने एक हजारांहून जास्त संख्येने जमलेल्या समुदायावर भीषण हल्ला केला. या दोघांनी बरोबर आणलेल्या ऑटोमॅटिक रायफल्समधून समोर जमलेल्या जमावावर अंदाधुंद गोळीबार केला. यावेळी शेकडो लोक जिवाच्या भीतीने सैरावैरा पळू लागले. या हल्ल्यात आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला असून ४० हून अधिक जण जखमी झाले आहेत.

•> पान २ वर

## महानगरपालिका निवडणुकीचे बिगुल वाजले

**| मुंबई | प्रतिनिधी |**

राज्याचे लक्ष लागलेल्या महानगरपालिका निवडणुकीचे बिगुल अखेर वाजले आहे. राज्य निवडणूक आयोगाने सोमवारी (दि.१५) पत्रकार परिषद घेत राज्यातील महापालिकांच्या निवडणुकींची मोठी घोषणा केली आहे. मुंबई, ठाण्यासह राज्यातील २९ महानगर पालिकांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या सर्व महापालिकांसांठी १५ जानेवारीला मतदान पार पडणार आहे, तर १६ जानेवारीला निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे.

•> पान २ वर



### असा असेल निवडणूक कार्यक्रम

- २३ ते ३० डिसेंबर – नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याचा कालावधी
- ३१ डिसेंबर – नामनिर्देशन पत्र छानणी
- २ जानेवारी – उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत
- ३ जानेवारी – निवडणूक चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवार यादी
- १५ जानेवारी – मतदान
- १६ जानेवारी – निवडणूक निकाल

### दुबार मतदारांना रोखण्यासाठी उपाययोजना

राज्य निवडणूक आयुक्तांनी सांगितले की, या निवडणुकीसाठी संभाव्य दुबार मतदाराची ओळख केलेली आहे. संभाव्य दुबार मतदारांच्या नावासमोर 'डबल स्टार' असे मार्क करण्यात आले आहे. या मतदारांच्या संदर्भात महापालिका आयुक्तांच्या मार्फत संभाव्य दुबार मतदारांच्या घरी जाऊन सर्वेक्षण करण्यात आले आहे. तसेच, दुबार मतदारांना विचारून तो कुठल्या मतदान केंद्रावर मत देईल, हे लिहून घेण्यात आले आहे. त्या मतदान केंद्राव्यतिरिक्त त्याला इतर कुठेही मतदान करू दिले जाणार नाही, असे राज्य निवडणूक आयुक्तांनी स्पष्ट केले.

## सत्ताधाऱ्यांकडून ड्रग्सच्या पैशाचा महापूर

### हर्षवर्धन सपकाळ यांची टिका

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचे वाटोळे होत असल्याची नवनवी उदाहरणे सातत्याने समोर येत आहेत. शासकीय जमिनींच्या विक्रीचे घोटाळे, टेंडरमधील कमिशन, समृद्धी शक्तीपीठ महामार्गातील भ्रष्टाचारातून कमावलेला पैसा कमी पडू लागल्याने सत्ताधारी आपल्या जवळच्या लोकांमार्फत अंमली पदार्थांचे कारखाने काढून राज्यातील युवा पिढीला व्यसनी बनवत आहेत. नगरपालिका निवडणुकीत या ड्रग्सच्या माध्यमातून कमावलेल्या पैशाचा महापूर आणून 'उडता महाराष्ट्र' बनविण्याचा घृणास्पद प्रकार सुरु आहे, अशी घणाघाती टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेला संबोधित करताना सपकाळ म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या साताऱ्यातील दरे गावातील घरापासून हाकेच्या अंतरावर अंमली पदार्थांचे उत्पादन करणारा कारखाना सुरु होता. या प्रकरणात दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या जवळच्या लोकांच्या या प्रकरणात सहभाग असल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या काही

•> पान २ वर

### बेजबाबदार वक्तव्य

विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ड्रग्स बनवणे सोपे आहे, असे बेजबाबदार वक्तव्य केले. यावरून तरुणाईचे भविष्य उद्ध्वस्त करणाऱ्या या विषाचा व्यापार रोखण्याबाबत ते गंभीर नाहीत हे स्पष्ट झाले आहे.

## हातपाय बांधून गाडीसकट जाळले

**| लातूर | प्रतिनिधी |**

लातूर जिल्ह्यात एक अत्यंत क्रूर आणि अंगावर काटा आणणारी घटना समोर आली आहे. येथील वानवडा रस्त्यावर उभी असलेली एक स्कोडा कार शनिवारी (दि.१३) रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास पेटताना स्थानिक नागरिकांच्या लक्षात आली. त्यांनी तातडीने आपत्कालीन क्रमांकावर माहिती दिल्यानंतर पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या मदतीने ही आग आटोक्यात

•> पान २ वर

## डिझेल तस्करी जोरात




**| उरण | प्रतिनिधी |**

उरणमधील समुद्रकिनाऱ्यांवर डिझेल व तत्सम तेलाची तस्करी खुलेआम सुरू आहे. मात्र, शासकीय यंत्रणेकडून कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे खुलेआम किनाऱ्यावर हा व्यवसाय करणाऱ्या डिझेल माफियांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नगरिकांमधून जोर धरू लागली आहे.

उरण तालुका हे एक बेट असून सभोवताली खाडी पसरलेली आहे. तसेच, या ठिकाणी मोराजेट्टी व जवळपास जेएनपीए बंदर आहे. त्याचा फायदा किनाऱ्यावर डिझेल व तत्सम तेलाची तस्करी करणारे माफिया घेत असून त्यांनी मोरा परिसरात धुमाकूळ घातला आहे. उरण परिसरात मागील काही वर्षांपासून जेएनपीटी बंदरात येणाऱ्या परदेशी जहाजातील कर्मचाऱ्यांशी संधान बांधून समुद्रकिनाऱ्यापासून दूर अंतरावर उभ्या राहणाऱ्या या जहाजातील डिझेल छोट्या बोटीत उतरवून खाडी मार्गाने तस्करी करण्याचे काम जोरात सुरु आहे. सागरी पोलीस

•> पान २ वर




जमाकर्ता शिक्षा और जागरूकता निधि
दीया फंड
DEPOSITOR EDUCATION AND AWARENESS FUND

तुमची KYC अद्ययावत ठेवा
ज्यामुळे तुमच्या बँकिंग सेवा चालू राहतील



जर तुमचा KYC तपशील बदलला नसेल तर,
पत्र/ऑनलाइन बँकिंग/मोबाइल बँकिंग/एटीएम/तुमच्या बँक किंवा बिझनेस करस्पाँड्ंट्सकडे (बीसीज) रजिस्टर असलेल्या तुमच्या मोबाइल नंबर/ईमेलद्वारे Re-KYC साठी स्व-घोषणा सादर करा.

जर तुमचा KYC तपशील बदलला असेल तर,
अपडेटची माहिती देणाऱ्या कोणत्याही कागदपत्राची एक प्रत द्या: आधार/मतदाता ओळखपत्र/NREGA जॉब कार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स/पासपोर्ट/नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टरने जारी केलेलं पत्र.

आपल्या बँकेच्या जवळच्या शाखेत जाऊनही KYC अपडेट करू शकता.

आरबीआय सांगते... जाणकार बना, सतर्क रहा!

अधिक माहितीसाठी, https://rbikehtahai.rbi.org.in/KYC वर जा
अधिकृत व्हॉट्सअॅप नंबर्स: 99990 41935/99309 91935

सार्वजनिक हितार्थ जारी
भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

# कोंडविल किनाऱ्यावर पर्यटकाचा प्रताप

## • वाळूवरती मंडप बांधून लग्न; स्थानिक प्रशासनाला माहितीच नाही



**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यातील कोंडविल समुद्रकिनारी एका पर्यटकाने मोठा प्रताप केला आहे. या पर्यटकाने पुण्याहून मंडपाचे सर्व साहित्य सोबत आणून कोंडविल समुद्रकिनारी असलेल्या सिल्वर सेंड हॉटेलच्या समोरच्या समुद्रकिनाऱ्यावर वाळूमध्ये मंडप व स्टेज उभारून आपल्या निकटवर्तीयाचे लग्न लावले. लग्नासाठी आलेल्या वधू-वरांची राहण्याची व्यवस्था हॉटेल सिल्वर सेंड या ठिकाणी करण्यात आली होती. धक्कादायक बाब म्हणजे हा विवाह सोहळा पार पडताना स्थानिक प्रशासनाची कोणत्याही प्रकारची परवानगी त्यांनी घेतली नसल्याची बाब समोर आली आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील समुद्र किनारे हे अत्यंत संवेदनशील मानले जातात. १९९३ साठी मुंबई साखळी बॉम्बस्फोटात वापरण्यात आलेले आरडीएक्स हे घातक स्फोटक याच ठिकाणी उतरविण्यात आले होते. त्यामुळे श्रीवर्धन तालुक्याचे नाव मोठ्या प्रमाणावर बदनाम झाले होते. आता श्रीवर्धनकडे पर्यटनाचा ओघ वाढला असून दरवर्षी असंख्य पर्यटक याठिकाणी भेटी देत असतात. मात्र, काही गुंड प्रवृत्तीच्या पर्यटकांमुळे स्थानिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. सार्वजनिक ठिकाणी आणि समुद्रकिनारी मद्य प्राशन करणे, स्थानिकांसह हॉटेल आणि कॉटेज मालकांसोबत दादागिरी करणे, अशा एक ना अनेक घटना पर्यटकांकडून घडत आहेत. त्यातच पुण्याच्या एका पर्यटकाने अत्यंत मोठा प्रताप केला आहे. त्याने चक्क पुण्यावरून येताना लग्नाच्या मंडापाचे साहित्य आणले. त्यांनी कोंडविल समुद्रकिनारी असलेल्या सिल्वर सेंड होटेलमध्ये राहण्याची व्यवस्था केली होती. आणि त्याच हॉटेलच्या समोरील समुद्रकिनारी लग्नासाठी मंडप उभारला आणि लग्न सोहळा देखील पार पडला. विशेष म्हणजे हा मंडप उभारण्यासाठी स्थानिक प्रशासनाची कोणतीही परवानगी घेण्यात आली नव्हती. त्यामुळे समुद्रकिनाऱ्यावर अवैधरित्या मंडप उभारेपर्यंत स्थानिक प्रशासनाला कानो कान खबर नाही, याचेच आश्चर्य वाटत असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे. असेच लग्न समारंभ सराईतपणे समुद्रकिनारी सुरू राहिल्यास स्थानिक देखील पैसे वाचवण्यासाठी याच ठिकाणी मंडप बांधून सोहळे पार पाडतील. परंतु, त्यांनी असे केले तर त्यांच्यावर तात्काळ कारवाई केली जाईल, अशा चर्चा जोर धरत आहेत. त्यामुळे हा लग्न समारंभ पार पाडण्यासाठी त्या ठिकाणची जागा कोणी उपलब्ध करून दिली? या लग्न समारंभासाठी कोणी परवानगी दिली? याबाबत स्थानिक प्रशासनाने चौकशी करणे अत्यंत आवश्यक आहे. तरी श्रीवर्धनचे तहसीलदार, गटविकास अधिकारी व पोलीस प्रशासनाने या प्रकरणी चौकशी करून संबंधितांसह लग्न समारंभ पार पाडण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या हॉटेल मालकावर देखील कारवाई करावी, अशी मागणी स्थानिकांमधून केली जात आहे.

# सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया सुरू

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर तिसऱ्या समांतर धावपट्टीच्या विकासासाठी सविस्तर तांत्रिक-व्यावसायिक व्यवहार्यता अभ्यास करण्याकरिता सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया सिडकोने सुरू केली आहे. या अभ्यासासाठी नामांकित व पात्र स्वतंत्र संस्था तसेच संयुक्त उपक्रम/संघटनांकडून निविदा मागविण्यासाठी प्रस्ताव मागणी तयार करण्यात आली आहे. ही पायरी सिडकोच्या दूरदृष्टीपूर्ण पायाभूत सुविधा नियोजनाची साक्ष देणारी असून, त्यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विकास हा परिसराच्या दीर्घकालीन वाढीच्या आणि विकासाच्या गरजांशी सुसंगतपणे सुरू राहील, याची खात्री होणार असल्याचे सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सांगितले आहे.


नि.०७/ड

**जाहीर नोटीस** **ॲड. विजय वि. पाटील**

**मुरुड येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे कोर्टात**

दि.चौ.अर्ज क्र.२७/२०२५

श्री. शिरिष मनोहर कर्णिक, वगैरे — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

याद्वारे जाहीर करण्यात येते की, मुरुड येथील मे. दिवाणी न्यायाधीश क्र. स्तर सो. यांचे न्यायालयांतील दिवाणी चौकशी अर्ज क्र. २७/२०२५ नुसार १. मौजे सायगांव, ता. मुरुड, जि. रायगड येथील गट क्र. व उपविभाग २९६ (जुना सर्व्हे नंबर ८२/७) एकुण क्षेत्र हे. आर २-०४-००, आकार रु.पै. १-८१, २. मौजे मुरुड, ता. मुरुड, जि. रायगड येथील गट क्र. व उपविभाग ५४/९, एकुण क्षेत्र हे. आर ०-०८-६०, आकार रु. पै. ०-९४ तसेच या जमिन मिळकतीवरील मुरुड नगरपरिषद हद्दीमधील मालमत्ता क्र.MUJA00000426, जुना मालमत्ता क्र.Z3W120000023, मॅन्युअल मालमत्ता क्र.१२/१४, क्षेत्र ६९.३९ चे निवासी खाजगी वापर असलेले घर मिळकत या मिळकती संदर्भात अर्जदार यांनी Section2 of Bombay Regulation Act VIII of 1827 प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेंकरीता अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार श्री. शिरिष मनोहर कर्णिक वगैरे यांचे व्यतिरिक्त त्यांना इतर कोणीही वारस म्हणून कोणाचेही नाहीत. जर कोण आणखीन वारस असतील तर त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्यांचे आंत आपला हक्क हितसंबंधाबाबत योग्य तो कायदेशीर पुरावा घेवून किंवा दिनांक १५/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर रहावे, अन्यथा अन्य कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन मे. कोर्ट पुढील कारवाई करेल.

सदर नोटीस आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्यासह दिले.

दिनांक : १५/१२/२०२५.

सही/- **कनिष्ठ लिपिक** **दिवाणी न्यायालय क.स्तर मुरुड**

सही/- **अधिक्षक** **दिवाणी न्यायालय क.स्तर मुरुड**


# रेल्वे पुलाचे काम धिम्यागतीने प्रवाशांमध्ये संतापाचे वातावरण



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

गव्हाणफाटा ते चिरनेर दरम्यानच्या मालगाडी रेल्वे मार्गावरील ओव्हरहेड जुन्या पुलाच्या दुरुस्तीचे काम मागील तीन वर्षांपासून रखडले आहे. त्यामुळे या मार्गावरून दररोज प्रवास करणाऱ्या वाहनांना २ किमी अंतरापर्यंत वळसा घालून प्रवास करावा लागत आहे. तसेच, अनेक वाहने जेएनपीए ते पळस्पे राष्ट्रीय महामार्गावरून विरुद्ध दिशेने धोकादायक प्रवास करीत आहेत. त्यामुळे प्रवासी आणि वाहन चालकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे.

मध्य रेल्वेच्या कंटेनर मालाची वाहतूक करणारा ओव्हरहेड जुना पुल वाहतूकीसाठी धोकादायक बनला होता. त्यामुळे तो पुल तोडून त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू केले आहे. या पुलाच्या बांधकामासाठी या मार्गावरुन ये-जा करणाऱ्या वाहनचालकांची व प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. परंतु, पर्यायी रस्ता वाहनांना गव्हाणफाटा सर्कलवरून सुमारे दिड किलोमीटरचा वळसा घालून चिर्लेमार्गावरुन प्रवास करावा लागत आहे. तर, चिरनेर मार्गावरून येणाऱ्या वाहनांना पनवेलकडून येणाऱ्या महामार्गाच्या उलट्या धोकादायक मार्गातून वळसा घेऊन गव्हाणफाटा मार्ग गाठावा लागत आहे. गव्हाणफाटा-चिरनेर मार्गावरील रेल्वे पुलाच्या अडथळ्यामुळे उरण तालुक्यातील जांभूळपाडा, वेश्वी, दिघोडे या गावाची एसटी बससेवा बंद झाली आहे. तसेच, या मार्गावर अपघाताचे प्रमाणात वाढले आहे.

## सुधागडात समृद्ध पंचायत राज अभियान

**पाली/बेणसे :** गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान संबंध महाराष्ट्रात राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने सुधागड तालुक्यात देखील महाराष्ट्र शासनाचा मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान संपन्न झाला. या अभियानात सुधागड पाली गटातून ग्रुप ग्रामपंचायत महागाव या ग्रामपंचायतीने सहभाग भाग घेतला आहे. अभियान कालावधीत ग्रामपंचायतीने केलेल्या उल्लेखनीय कामांचे व विविध उपक्रमाचे चित्रीकरण शासन स्तरावरून यावेळी करण्यात आले. मुख्यमंत्री समृद्धी राज पंचायत अभियानात पाली पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी लता मोहिते, सहाय्यक विकास अधिकारी अविनाश घरत, अशोक महामुनी, शासन प्रतिनिधी प्रदीप गोरे, मनेश महातो, पंचायत समितीचे धनंजय पाटील, विस्तार अधिकारी, सरपंच दीपिका सुतार, भास्कर पार्टे, महेश दानविले, नितीन भोसले, किसन गवारणे, रमेश जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.


**जाहीर सूचना**

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की आमचे अशिल (१) **कु. चित्रा गिडवानी** आणि (२) **श्री. इम्तियाज सत्तार उमरभॉय** (यापुढे एकत्रितपणे **"मालक"** म्हणून संदर्भित) सोबत येथे खाली लिहलेल्या **परिशिष्टात** अधिक विशेषत्वाने वर्णन केलेली जमीनीचा (यापुढे एकत्रितपणे **"सदर जमीन"** म्हणून संदर्भित) प्रस्तावित संपादनासाठी वाटाघाटी करत आहोत, आणि म्हणून त्यांनी आम्हाला सदर जमीनीच्या मालकांच्या शीर्षकाची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत.

सर्व व्यक्तिं ज्यांना सदर जमीन किंवा त्याच्या कोणत्याही भाग/भागा संदर्भात कोणताही हक्क, शीर्षक, दावा, हितसंबंध किंवा प्रतिपादन जसे की करार, विक्री, हस्तांतरण, देवाण घेवाण, गहाण, ताबा, भेट, ट्रस्ट, देखभाल, वारसहक्क, ताबा, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, भाडेतत्त्वाखाली, विकास हक्क, भाडेकरार, धारणाधिकार, भाग, परवाना, आउटगोइंग्स, वहिवाटीचा हक्क, अडथळा, करार, अट किंवा कोणत्याही न्यायालय किंवा ऑथॉरिटीचा हुकूम, आदेश किंवा बक्षीस किंवा अन्यथा कोणत्याही स्वरुपात असेल तर त्यांनी कृपया लेखीस्वरुपात त्याची सूचना कागदोपत्री पुराव्यासोबत निम्नस्वाक्षरीकारांकडे त्यांचे कार्यालय रेडीमनी मेन्शन, ४३, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ आणि/किंवा इमेल kunal.vaidya@kangacompany.com वर येथे ह्या प्रसिद्ध झाल्यापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत सूचित करावे अन्यथा सर्व किंवा कोणतेही कथित दावा/ आक्षेप, हितसंबंध किंवा मागणी सोडून देण्यात आले आहेत आणि/किंवा त्याग केले आहेत असे मानले जाईल.

**येथे उपरोक्त उल्लेखित परिशिष्ट**

(सदर जमीनीचे वर्णन)

कृषी जमीनीचे सर्व तुकडे आणि हिस्से ज्याचे गट क्र. ५१ मोजमाप ४२ आर्स ३० चौरस मीटर्स किंवा सुमारे तेवढेच यासह त्यावर उभे ग्राउंड प्लस १ (एक) वरचा मजल्याचे बंगलो, आणि जे मौजे टेकाळी, तालुका अलिबाग आणि जिल्हा रायगड येथे स्थित आणि असलेले.

१६ डिसेंबर, २०२५ रोजी दिनांकित.

**कांगा आणि कंपनी**
सही/-
कुणाल वैद्य
भागीदार
ॲडव्होकेटस् आणि सॉलिसिटर्स



**जाहीर सूचना**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल अनिता रामेश्वर नरवडे, रा. बी-१०१, मयूर पार्क, प्लॉट नं.१/२२, पोलीस स्टेशनसमोर, सेक्टर ३६, कामोठे, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांनी खालील वर्णनाची शेतजमीन/प्लॉट मिळकत तिचे मालक रमाकांत तुकाराम साटम, रा.४५, रुम नं.२०, डॉ.जी.एम.भोसले मार्ग, जांबोरी मैदानजवळ, वरळी, मुंबई, महाराष्ट्र, ४०००१८ यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**जमीन/प्लॉट मिळकतीचे वर्णन:-**

मौजे-वंजारवाडी, तालुका कर्जत, जिल्हा-रायगड येथील कोकण कृषी फलोद्यान विकास सहकारी संस्था मर्यादित, वंजारपाडा, ता.कर्जत, जि.रायगड येथील प्लॉट मिळकत

| प्लॉट क्रमांक | ब्लॉक क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. |
|---|---|---|
| जुना ६७४<br>नवीन १० | ए | ०.१३.५० |

वरील जमीन/प्लॉट मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण, दान, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर सूचना आहे.

दिनांक : १५ डिसेंबर २०२५

**अधिवक्ता सुशांत बालाजी पुरी**
बी.एल.एस.एलएल.बी.
पत्ता : ५०२, पाचवा मजला, विंग ५ सी,
राधे गॅलेक्सी, भिसेगांव, कर्जत,
ता.कर्जत, जि.रायगड
भ्रमणध्वनी ९०११६५३४६७


पान १ वरून

## तलाठी, सर्कलचा कामांवर बहिष्कार

सर्टीफिकेट मशीन) तहसीलदारांकडे जमा करण्यात आली. या ऑनलाईन काम बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. त्याचा मोठा परिणाम शासकीय कामांवर झाला.

सातबारा फेरफार नोंदणी, पीक पाहणी आदी कामे गतीमान व्हावीत, यासाठी शासनाने ऑनलाईन सेवेवर भर दिला आहे. पंचनामा प्रणालीसह ई हक्क, सातबारा वाटप आदी कामे कार्यक्षमतेने प्रदान करण्यासाटी संगणकीकृत साधन सामुग्री तलाठी तथा ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांना देण्यात आली. २०१६पासून ही प्रक्रीया राबविण्यात येत आहे. लॅपटॉप व प्रिंटर ही २०१६ ते २०१९ दरम्यान उपलब्ध करण्यात आली आहेत. त्यामुळे ही सामुग्री कालबाह्य झाले आहेत. सातबारा व आठ 'अ' व फेरफार यांच्या नक्कल वितरणाची ठरवून दिलेली फी ग्राम महसूल अधिकारी दर महिन्याला शासन जमा करीत आहेत. आयटी उपकरणांचे आयुष्यमान पाच वर्षे इतके असल्याचे शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आले आहे. परंतु, या उपकरणांचा कालावधीत अधिक झाला आहे. ही उपकरणे कालबाह्य व नादूरुस्त व निकृष्ट अवस्थेत आहेत. या उपकरणांची कार्य गती फारच कमी आहे. पंचनामा प्रणालीसह ई हक्क सारख्या सुधारीत प्रणालींवर कामे करणे अशक्य होत नाही. त्यामुळे ऑनलाईन सेवा वेळेत देताना अडचणी निर्माण होत आहेत. प्रचंड कामकाजाच्या ताणामुळे कर्मचारी वर्गात मानसीक तणाव व असंतोष निर्माण होत आहे. त्याचा आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे नवीन उपकरणे देण्यात यावी, अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. शासन निर्णय असूनही उपकरणे खरेदी प्रक्रीया रखडल्याचे चित्र आहे. शासनाच्या धोरणाचे यातून उल्लंघन होत असल्याचा आरोप तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याकडून करण्यात आला आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या महाराष्ट्र राज्य तलाठी संघाच्यावतीने संपूर्ण राज्या ऑनलाईन कामकाज पुर्णतः बंद करण्याची भुमिका घेतली आहे. त्याची कार्यवाही सोमवारपासून सूरू केली आहे. रायगड जिल्ह्यातील तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी या आंदोलनात सहभाग घेतला. जिल्ह्यातील सहाशेहून अधिक तलाठी व मंडळ अधिकारी यांनी ऑनलाईन कामावर बहिष्कार टाकत नवीन उपकरणे देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी जिल्ह्यातील तहसीलदार यांना डीजीटल सिग्नेचर सर्टीफिकेट मशीन देण्यात आली.

**मागण्यांवर दृष्टीक्षेप**

शासन निर्णयानुसार नवीन लॅपटॉप व प्रिंटरची जीईएम पोर्टलद्वारे खरेदी प्रक्रीया तात्काळ सुरू करून सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांना तातडीने उपलब्ध करून द्यावे. कालबाह्य उपकरणांच्या विल्हेवाट प्रक्रीया त्वरित पूर्ण करण्यात यावी. खरेदी प्रक्रीयेतील अनावश्यक विलांबाबाबत विभागीय स्तरावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

## सत्ताधाऱ्यांकडून ड्रग्सच्या पैशाचा महापूर

आरोपीला सोडून दिले. काही बंगाली आणि बांग्लादेशी कामगारांना अटक करून मुख्य सुत्रधाराला सोडून देण्याचे प्रयत्न सुरु आहेत. ड्रग्स निर्मिती करणाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या महायुती सरकारने सातारा ड्रग्स फॅक्टरी प्रकरणी उत्तरे द्यावीत. मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने तिथे जाऊन धाड घालेपर्यंत सातारा पोलिसांना यांची कल्पना नव्हती का? त्यांच्या आशिर्वादानेच हा कारखाना सुरु होता? की उपमुख्यमंत्र्यांच्या जवळचे लोक हा कारखाना चालवत असल्याने कारवाई होतं नव्हती? असा आरोप सकपाळ यांनी केला आहे.

## डिझेल तस्करी जोरात

ठाणे तसेच तटरक्षक दल यांना या तस्करीची माहिती असून, त्यांच्या आशीर्वादानेच हा व्यवसाय राजरोसपणे सुरु आहेत, असा आरोप स्थानिकांमधून होत आहे. तसेच, परदेशी जहाजातून जवळपास ३० रुपये लीटरने मिळणारे हे डिझेल बाजारपेठेत जादा दराने विक्री करून महसूल बुडवण्याचे काम हे तस्कर करत असल्याचे देखील स्थानिकांमधून बोलले जात आहे.

ही तसकरी सर्रास खाडीच्या परिसरातून सुरू आहे. गेल्या काही दिवसांत याचा जोर वाढला असून हे समुद्र चाचे बाहेरून येणाऱ्या बार्जे सच्या चालकांकडून हजारो लिटर डिझेल कमी भावात विकत घेतात आणि ते साठवून ठेवतात. सध्या डिझेलच्या वाढत्या किंमती पाहता, काळ्या बाजारातून गाडी व्यावसायिक डिझेल घेताना दिसत आहेत. उरणसह पनवेल, वडखळ, नागोठणे या भागातील ट्रान्सपोर्टचा धंदा करणारे या समुद्र चाच्यांशी संपर्क करून, डिझेल खरेदी करतात. त्यामुळे याकडे सागरी पोलीस ठाण्याचे दुर्लक्ष होत असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे. तसेच, माफियांकडून तस्करी करण्यासाठी वापरला जाणार सुमद्रीमार्गाचा वापर भविष्यात अतिरेकी देखील करू शकतील. त्यामुळे याकडे पोलीस प्रशासनाने गांभीर्याने बघणे गरजेचे असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे.

## महानगरपालिका निवडणुकीचे बिगुल वाजले

गेल्या काही महिन्यांपासून राजकीय आरोप-प्रत्यारोप, न्यायलयीन लढा आणि सरतेशेवटी ३१ जानेवारीच्या अंतिम मुदतीचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यामुळे चर्चेत असलेल्या राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुका सोमवारी अखेर राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केल्या आहेत. सोमवारी झालेल्या पत्रकार परिषदेत राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी सांगितले की, मुदत संपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्यासाठी करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यासाठी ही परिषद घेण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यातील २९ महापालिका निवडणुकीच्या संदर्भात ही पत्रकार परिषद असून २९ पैकी २७ महापालिकेची मुदत संपलेली आहे. त्यातील ५ महापालिकेची मुदत २०२० मध्ये, मुंबईसह १८ महापालिकांची मुदत २०२२ मध्ये, तर ४ महापालिकांची मुदत ही २०२३ मध्ये संपलेली आहे. तसेच, राज्यातील २९ महानगरपालिका क्षेत्रात सोमवारपासून निवडणुकीची आचारसंहिता लागू होणार असल्याची माहिती देखील निवडणूक आयुक्तांनी दिली.

## बाप लेकाचा अंदाधुंद गोळीबार

ऑस्ट्रेलियन पोलिसांनी हल्लेखोरांची ओळख जाहीर केली असून त्यानुसार एक हल्लेखोर नवीद अक्रम (२४) तर दुसरा हल्लेखोर नवीदचाच पिता साजिद अक्रम (५०)होता. यापैकी साजिदचा घटनास्थळीच पोलिसांच्या गोळीबारात मृत्यू झाला असून नवीदला पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी बोंडी बीचवरील हल्ल्यावर निवेदन जारी केले असून घडलेल्या प्रकाराचा आपल्याला धक्का बसल्याचे नमूद केले आहे. प्रशासन नागरिकांना सर्वतोपरी मदत करत असून एनएसडब्ल्यू पोलीस घटनेची सखोल चौकशी करत असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

## हातपाय बांधून गाडीसकट जाळले

आणण्यात आली. मात्र, तोपर्यंत कार पूर्णपणे जळून खाक झाली होती. त्यांनतर गाडीचा तपास घेतला असता आतमध्ये एका व्यक्तीचा मृतदेह जळून कोळसा झाल्याचे आढळून आले. धक्कादायक बाब म्हणजे, मृतदेहाचे हातपाय बांधलेले होते. त्यामुळे हा अपघात नसून पूर्वनियोजित आणि अत्यंत क्रूर घातपात असल्याचा पोलिसांचा संशय बळावला. प्रथमदर्शनी मृत तरूणाची ओळख पटली असून गणेश गोपीनाथ चव्हाण (३५) असे त्याचे नाव आहे. तो एका खासगी फायनान्स कंपनीत लातूर डिव्हिजनचा प्रमुख म्हणून कार्यरत होता. या हत्याकांडामागे अनैतिक संबंध, आर्थिक व्यवहार किंवा अन्य कोणताही गुन्हेगारी कट आहे का, याचा सखोल तपास पोलीस करत आहेत.


**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे सुरव तर्फे निजामपुर ता.माणगाव, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक उषा अशोक जोहरी व परशुन अशोक जोहरी यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे मौजे सुर तर्फे निजामपुर ता. माणगाव, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ३९९ | ० | ०-१०-४० | १-२५ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ०७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १६/१२/२०२५
मो .९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२,साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड



**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे सावळे, ता. कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक उषा अशोक जोहरी व परशुन अशोक जोहरी यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे सावळे,ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| १०१ | १८ | ०-४३-०० पैकी विकत दिलेले क्षेत्र ०-२१-०० | ०-४५ |
| १०१ | १९ | ०-०६-०० | ०-०६ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १६/१२/२०२५
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड



**जाहिर नोटिस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली जमीन मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक यास्मिन अताउल्ला घय्ये, वगैरे यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वांदेली, ता.मुरूड | २६३ | १-०५-२० | १०.१२ |

वर नमुद केलेली मिळकत खरेदी-विक्री करण्यापुर्वीच्या जाहिर नोटिशीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : १५/१२/२०२५

सही/-
**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा.आगरी पॅलेस, मु.पो.चिंचोटी
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९२७२६२०००५



**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिल सौ.सविता भुषण साळसिंगीकर रा. मु. पो. चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड यांची मौजे नागांव, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत खालील मालकांकडून विकत घेण्याचे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) | मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| नागांव, ता.अलिबाग, जि. रायगड. | १७१५ | ०-१५-२०<br>पो.ख.०-०१-५०<br>एकूण ०-१६-७० | ३.३० | मंगेश चंद्रकांत चव्हाण |

**एकूण क्षेत्र ०-१६-७० हे.आर. पैकी ०-०६-० हे.आर. इतक्या क्षेत्राची मिळकत**

सदर मिळकतीवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतीवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहित आहेत असे गृहित धरून सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती/ तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १५/१२/२०२५.

**ॲड. सुनिल के. वाकडे**
डी-१, तळमजला,
हिराबाग को. ऑप. हौ. सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. नं. ९८६७७१५५२४

# निवडक

## पाली एसटी स्थानकाच्या दुरवस्थेचा प्रश्न अधिवेशनात

**पाली :** रायगड जिल्ह्यातील अष्टविनायकांपैकी एक असलेल्या पाली येथील श्री बल्लाळेश्वर गणपती मंदिराला दरवर्षी हजारो भाविक भेट देतात, या भाविकांचा प्रवास प्रामुख्याने महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या एसटी बससेवेवर अवलंबून असतो. मात्र पाली येथील एसटी बसस्थानकाची गेल्या पाच ते सहा वर्षांपासून सुरू असलेली दुरवस्था अद्यापही कायम असून, या प्रश्नाकडे स्थानिक लोकप्रतिनिधींकडून सातत्याने दुर्लक्ष करत मूगगीळून असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. या पार्श्वभूमीवर, १४ डिसेंबर रोजी हिवाळी अधिवेशनात उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वर्सावाचे आमदार हरून खान यांनी पाली बसस्थानकाच्या दुरवस्थेचा मुद्दा विधानसभेत उपस्थित केला. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, बसस्थानक परिसरात धुळीचे प्रचंड साम्राज्य पसरले असून, प्रवाशांना व भाविकांना यामुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शौचालयांची अवस्था अत्यंत खराब असून, पिण्याच्या पाण्याचीही कोणतीही व्यवस्था नाही. ही परिस्थिती भाविकांसह स्थानिक नागरिकांसाठीही अत्यंत त्रासदायक ठरत आहे. पालीसारख्या धार्मिक महत्त्वाच्या ठिकाणी सार्वजनिक सुविधा सक्षम असणे ही प्राथमिक गरज असल्याचे नागरिकांचे मत आहे.

## चोरट्यांना पोलिसांनी घेतले ताब्यात

**पनवेल :** महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र खेचुन पसार होणाऱ्या त्रिकुटापैकी दोघांना अजमेर राजस्थान येथुन पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. फिर्यादी ज्योती जानकर या पनवेल हददीतील वडाळे तलाव स्मशानभूमी येथून घरी जात असताना आरोपीत यांनी रिक्षामधुन येवून त्यांच्या गळ्यातील दोन सोन्याचे मंगळसुत्र खेचुन चोरी करून पळुन गेले होते. या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात होताच वपोनि नितीन ठाकरे यांचे मागर्दशनाखालीी तपास पथकाने तांत्रिक तपास व सीसीटीव्ही. फुटेजच्या आधारे आरोपी मोहम्मद इर्शाद मोहम्मद नौशाद सिध्दीकी वय-२२ वर्षे, धंदा-रिक्षा चालक रा.गोवंडी व त्याचा सहकारी अफरोज फिरोज शेख वय-१८ रा. गोवंडी तसेच आवेश यांनी रिक्षा मधुन येवून त्यांचे सोन्याचे मंगळसुत्र खेचुन पसार झाले होते.



## ज्येष्ठ नागरिक संघाचा स्नेहमेळावा

**सुतारवाडी :** शिवशंभो ज्येष्ठ नागरिक संघ सुतारवाडीचा स्नेहमेळावा नुकताच सुतारवाडी येथील द. ग. तटकरे माध्यमिक विद्यालय सुतारवाडी येथील सभागृहात संपन्न झाला.यावेळी कुडली विभागातील अनेक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन. आणि मृत व्यक्तींना श्रद्धांजली वाहून करण्यात आली. ज्येष्ठ नागरिकांना शासनाकडून ज्या ज्या सुविधा मिळतात या सुविधांचा पाठपुरावा करून त्या सुविधा ज्येष्ठ नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी शिवशंभो ज्येष्ठ नागरिक संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेऊन, स्नेहमेळावा पार पाडला. यावेळी अनेकांनी आपले मत व्यक्त केले. स्नेह भोजनानंतर स्नेह मेळाव्याची सांगता करण्यात आली.



## वणव्याने वृक्ष होरपळून खाक

**सुतारवाडी :** दरवर्षी मार्च महिना उजाडला की डोंगरांना वनवे लागत असत. मात्र यावर्षी डिसेंबर महिन्यातच डोंगरांना वनवे लागत असल्यामुळे चिंचेचा विषय झाला आहे. नारायणगावापासून एक किमी अंतरावर प्रचंड प्रमाणावर डोंगराला वणवा लागला होता. विशेष म्हणजे सध्या प्रचंड प्रमाणावर थंडी पडत असल्यामुळे अनेक लहान मोठे वृक्ष टवटवीत दिसत असताना नव्याने वृक्ष जोमाने वाढत असताना, प्रचंड प्रमाणावर लागलेल्या वनव्यामुळे अनेक लहान-मोठे वृक्ष जळून खाक झाले आहेत. शाकाहारी मांसाहारी प्राण्यांचे निवारे नष्ट झालेले आहेत. मात्र दरवर्षाप्रमाणे जंगल खात्याचे याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे जंगले नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. हे वणवे अज्ञात व्यक्ती जाणीवपूर्वक लावत असते. याचा शोध घेणे काळाची गरज आहे. नाहीतर सर्व जंगले नष्ट होऊन त्या ठिकाणी उजाड माळराने दिसतील. वन्य प्राण्यांना निवाऱ्यासाठी भटकंती करावी लागेल. जंगलातील रानमेवा चाखायला मिळणार नाही. कोणीतरी आपल्या स्वार्थासाठी वनवा लावून बाजूला होतो. हे दर वर्षाचेच आहे. याचा शोध घेणे जरुरीचे आहे.

## गुंतवणुकीच्या नावावर फसवणूक

**पनवेल :** गुंतवणूक केलेल्या रकमेवर कोणताही नफा आणि गुंतवणूक केलेली रक्कम परत न करता फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सहा अनोळखी व्यक्तींविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुजवा चक्रवर्ती हे कळंबोली, सेक्टर १६ येथे राहत असून ते फिल्म इंडस्ट्रीमध्ये पोस्ट प्रोडक्शन मार्केटिंग करतात. त्यांना शेअर मार्केट ट्रेडिंग संदर्भात जाहिरात दिसली. त्या लिंकवर क्लिक केले असता त्यांना व्हॉट्सॲप ग्रुपवर ॲड करण्यात आले. ट्रेडिंग करायचा असल्यास ॲपवर पैसे टाकावे लागतील असे सांगितले. त्यावेळी त्यांनी पैसे गुंतवले आणि ट्रेडिंग सुरू केली. त्यांना १० हजार रुपयांचा फायदा झाला. त्यानंतर त्यांनी २५ हजार रुपये पाठवले आणि त्यांना एक लाख रुपये नफा मिळाला. चांगला परतावा मिळत असल्याने ठेवला विश्वास पैसे अकाउंटवर येतात का हे पाहण्यासाठी त्यांनी बँक खात्यावर रक्कम ट्रान्सफर केली. ते त्यांच्या बँक खात्यावर दिसले. त्यामुळे त्यांचा विश्वास वाढला आणि त्यांनी आणखी पैसे ट्रान्सफर केले. त्यांना लाखांचा नफा दिसत होता. त्यांनी एकूण २१ लाख ७४ हजार रुपये जमा केले असता ॲपवर एक कोटी रुपये दिसून आले. त्यानंतर त्यांनी पैसे ट्रान्सफर करण्याचा प्रयत्न केला, मात्र ते ट्रान्सफर झाले नाहीत. त्यावेळी तुम्हाला १० लाख रुपये ३ कमिशन भरावे लागेल, त्यानंतर ते पैसे खात्यावर जमा होतील असे सांगितले.

# स्थानक महोत्सवातून इतिहासाला स्पर्श

## पर्यटकांना अनुभवता आली माथेरानची ओळख; ऐतिहासिक वस्तू, डिजिटल सादरीकरणांनी वेधले लक्ष




● (संग्रहित : छायाचित्र)

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

नेरळ-माथेरान लाइट रेल्वेच्या ११८ वर्षांच्या गौरवशाली वारशाचा साक्षीदार ठरलेला माथेरान स्थानक महोत्सव शनिवारी (ता. १३) मध्य रेल्वेकडून उत्साहात साजरा करण्यात आला.

रेल्वे बोर्डाच्या सूचनेनुसार आयोजित या महोत्सवात ऐतिहासिक वस्तूंचे भव्य प्रदर्शन, दुर्मिळ रेल्वे वारसा साहित्य आणि अत्याधुनिक डिजिटल सादरीकरण ही खास आकर्षणे ठरली.माथेरान स्थानक परिसरात भरविण्यात आलेल्या या प्रदर्शनात माथेरान लाइट रेल्वेच्या वैभवशाली इतिहासाशी निगडित मूळ आणि आजही अस्तित्वात असलेल्या रोलिंग स्टॉकचे सादरीकरण करण्यात आले.

स्टीम लोको ७९४बी, चारचाकी बोगी फ्लॅट रेल (बीएफआर) वॅगन, दार्जिलिंग हिमालयन रेल्वेची नॅरो गेज बोगी तसेच माथेरान लाइट रेल्वेच्या बोग्यांनी पाहुण्यांचे लक्ष वेधले. बार्शी लाइट इंजिनचे कार्यरत मॉडेल, जुन्या काळातील स्थानक कर्मचाऱ्यांचे बॅज, पॉइंट्समनचे पट्टे, हातघंटी, लाकडी रोख पेटी, मोजमाप काटे, सिग्नलिंग दिवे, तेलाचे कॅन, पाणी देण्यासाठीचे ग्लास, काचेचे निगेटिव्ह अशा दुर्मिळ वारसा वस्तूंमुळे प्रदर्शनाला इतिहासाचा जिवंत स्पर्श मिळाला.

डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत व्हीआर ऑक्युलस चष्म्यांद्वारे नेरळ-माथेरान मार्गाची ३६० अंशांतील व्हर्च्युअल सफारी अनुभवण्याची संधी अभ्यागतांना देण्यात आली. यासोबतच नेरळ-माथेरानशी संबंधित डायऱ्या, कॉफी मग्स, टी-शर्ट आणि की-चेन यांसारखी स्मृतिचिन्हे विक्रीसाठी उपलब्ध होती. सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत खुले असलेले हे प्रदर्शन प्रवासी, पर्यटक आणि स्थानिक रहिवाशांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळवत २०० हून अधिक अभ्यागतांनी पाहिले.

शतकाहून अधिक जुना रेल्वे प्रवासनेरळ-माथेरान नॅरो गेज रेल्वे मार्गाच्या बांधकामास १९०४ मध्ये सुरुवात होऊन १९०७ मध्ये तो वाहतुकीस खुला झाला. डोंगराळ भागातून जाणाऱ्या या मार्गावर मध्य रेल्वेकडून रेल्वे सेवा चालवली जाते. पावसाळ्यात खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण मार्ग बंद ठेवला जात असला, तरी अमन लॉज-माथेरानदरम्यान २०१२ पासून शटल सेवा सुरू आहे.

**सेवा, प्रवासी आणि उत्पन्न**

सध्या नेरळ- माथेरान- नेरळदरम्यान दररोज चार गाड्या, तर अमन लॉज- माथेरान- अमन लॉजदरम्यान एकूण १६ सेवा चालवल्या जातात.


### नवीन डबे, नवा अनुभव

प्रवाशांचा प्रवास अधिक सुखद आणि संस्मरणीय व्हावा, यासाठी मध्य रेल्वेने विंटेज रंगसंगती, लाकडी फिनिशिंग, सुधारित आसनव्यवस्था आणि प्रथम श्रेणीतील अतिरिक्त सुविधांसह नव्याने पुनर्रचित डबे सेवेत दाखल केले आहेत. निसर्गाच्या सान्निध्यातून जाणारा हा टॉय ट्रेन प्रवास केवळ पर्यटनाचा भाग न राहता थरारक आणि अविस्मरणीय अनुभव देणारा ठरत आहे. त्यामुळे पर्यटनाला चालना मिळून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार असून रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण होण्यास मदत होणार आहे.

### प्रदर्शनातील खास आकर्षण

स्टीम लोको ७९४बी- दार्जिलिंग हिमालयन रेल्वे बोगी- माथेरान लाइट रेल्वेचे मूळ डबे- बार्शी लाइट इंजिनचे कार्यरत मॉडेल.रेल्वेचा जिवंत इतिहास- जुने बॅज, हातघंट्या, सिग्नल दिवे- लाकडी रोख पेटी, मोजमाप काटे- काचेचे निगेटिव्ह आणि वारसा साहित्य.
सध्याची रेल्वे सेवा- नेरळ-माथेरान : दररोज ४ गाड्या- अमन लॉज-माथेरान : १६ सेवा- सुट्टीच्या दिवशी विशेष गाड्या.-
प्रवासी आणि उत्पन्न (नोव्हेंबर २०२५)- प्रवासी : ३८,१६४- उत्पन्न : २९.१८ लाख.

# किसान प्रदर्शन ठरतंय उत्पन्न वाढीचा मार्ग



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

पुणे जिल्ह्यातील मोशी येथे सुरू असलेले भारतातील सर्वात मोठे किसान प्रदर्शन हे केवळ एक प्रदर्शन न राहता शेतकऱ्यांच्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरत आहे. दिनांक १० डिसेंबर ते १४ डिसेंबर या कालावधीत भरविण्यात आलेल्या या भव्य कृषी प्रदर्शनात पारंपारिक शेतीकडून आधुनिक, शाश्वत आणि उत्पन्नवाढीच्या शेतीकडे वाटचाल करण्याचा अचूक मार्ग शेतकऱ्यांना दाखविण्यात येत आहे.

या प्रदर्शनाला माणगाव येथील स्वराज्य संघटनेचे संस्थापक व शेतकरी नेते पंकज तांबे यांनी प्रत्यक्ष भेट देत आधुनिक शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान, उपकरणे व प्रयोगांची सखोल माहिती घेतली. शेतकऱ्यांच्या हितासाठी उपयोगी ठरणाऱ्या नवकल्पना, यंत्रसामग्री आणि संशोधनाधारित शेती पद्धती यांचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला. या किसान प्रदर्शनात शेतकऱ्यांना लागणारी आधुनिक शेती अवजारे, यांत्रिकीकरणासाठी आवश्यक उपकरणे, ड्रिप व स्प्रिंकलर सिंचन प्रणाली, पाणी व्यवस्थापनासाठी विविध प्रकारचे पंप व साधने, तसेच माती परीक्षणाच्या आधुनिक पद्धती यांची सविस्तर माहिती देण्यात येत आहे. उत्पादन खर्च कमी करून नफा वाढवण्यासाठी कोणती साधने आणि तंत्रज्ञान उपयुक्त ठरू शकतात, याचे प्रत्यक्ष मार्गदर्शन येथे मिळत आहे. शेतीपूरक उद्योगांमध्ये रस असणाऱ्या तरुण-तरुणींना छोट्या उद्योगापासून मोठ्या उद्योगांपर्यंत लागणाऱ्या आधुनिक मशिनरी, नव्या तंत्रज्ञानातून विकसित करण्यात आलेली यंत्रसामग्री प्रत्यक्ष पाहण्याची व समजून घेण्याची संधी या प्रदर्शनातून मिळत आहे. कृषी उद्योजकतेकडे वळू इच्छिणाऱ्या युवकांसाठी हे प्रदर्शन प्रेरणादायी ठरत आहे. या प्रदर्शनात कृषिविषयक बी-बियाणे, रोपे, ऊस वाटिका, तसेच विविध पिकांसाठी उपयुक्त असणाऱ्या सुधारित जाती शेतकऱ्यांना पाहायला मिळत आहेत. शेतकऱ्यांनी आपल्या शेतात नवे प्रयोग करावेत, पीक पद्धतीत बदल घडवावा आणि शाश्वत शेतीकडे वाटचाल करावी, यावर या प्रदर्शनात विशेष भर देण्यात आला आहे. याशिवाय गांडूळ खत निर्मिती, शेततळ्यासाठी आवश्यक ताडपत्री, आधुनिक प्लास्टिक कल्चर, संरक्षित शेती यांचा शेतीमध्ये कसा प्रभावी उपयोग करता येतो, याची सखोल माहिती तज्ज्ञांच्या माध्यमातून दिली जात आहे.



# प्रोफेसर डॉ.अनिल सिंह यांना साहित्य गौरव पुरस्कार प्रदान

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

सोनू बसवंत महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. अनिल सिंह यांना साहित्य गौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान व महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आधुनिक हिंदी साहित्य में मूल्यविमर्श परंपरा, परिवर्तन और चुनौतियाँ या एकदिवसीय राष्ट्रीय संमेलनाचे ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. याच संमेलनाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या साहित्यिक, शैक्षणिक व अकॅडमिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला.

प्रोफेसर डॉ.अनिल सिंह यांची विद्वत्ता, सातत्यपूर्ण साहित्यसाधना, संशोधनात्मक दृष्टिकोन आणि मूल्याधिष्ठित लेखन हे हिंदी साहित्य क्षेत्रासाठी मार्गदर्शक ठरले आहे.

## नातेवाईकांनी मारला दागिन्यांवर डल्ला

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

घरी पाहुणे म्हणून राहावयास आलेल्या नातेवाइकांनी दागिने चोरून नेल्याची घटना विचुंबे येथे घडली. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

राधिका चौहान या विचुंबे येथे राहत असून त्यांचे दोन नातेवाईक त्यांच्या घरी आले होते. त्यांनी जेवण करून घरी मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी सकाळी राधिका उठल्या असता त्यांना घरातील साहित्य विस्कटलेले दिसले. रोख रक्कम १५ हजार, सोन्याचे दागिने, चांदीच्या अंगठ्या, मोबाईल, मनगटी घड्याळ, एटीएम कार्ड सापडून आले नाहीत. त्यामुळे दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. खांदेश्वर पोलिसांनी अधिक तपास सुरू केला आहे.

# सिकलसेल, थॅलेसेमिया, हेमोफिलिया जनजागृती सप्ताह

**। रायगड । प्रतिनिधी ।**

जिल्हा आरोग्य विभागामार्फत सिकलसेल, थॅलेसेमिया व हेमोफिलिया या अनुवंशिक रक्तविकारांविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी ११ ते १७ डिसेंबर २०२५ दरम्यान जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या अभियानाद्वारे नागरिकांमध्ये तपासणी, निदान आणि उपचाराबाबत जागरूकता वाढविण्यावर भर दिला जात आहे. जिल्ह्यात सध्या एकूण ५१० सिकलसेल वाहक आणि ५७ सिकलसेल ग्रस्त रुग्ण आढळले आहेत. त्यापैकी २२ रुग्णांना हायड्रॉक्सियुरिया हे औषध उपचारासाठी सुरू करण्यात आले असून त्यांच्या आरोग्यात उल्लेखनीय सुधारणा झाल्याचे आरोग्य विभागाने सांगितले. तसेच इतर रुग्णांना नियमित फॉलिक ॲसिड देण्यात येत आहे. जिल्ह्यात सर्व गर्भवती महिलांची प्रसूतीदरम्यान सिकलसेल तपासणी केली जाते आणि जर त्या वाहक अथवा रुग्ण आढळल्या, तर त्यांच्या पतीचीही तपासणी करण्यात येते.

रक्ताशी संबंधित अनुवंशिक आजारांचे लवकर निदान, तपासणीचे प्रमाण वाढविणे आणि उपचार सुविधा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा प्रमुख हेतू आहे.

या आठवड्यात सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयात पुढील उपक्रम राबविले जात आहेत सिकलसेल, थॅलेसेमिया, हेमोफिलिया तपासणी शिबिरे, हिमोग्लोबिन चाचणी आणि सिकलसेल सॉल्युबिलीटी टेस्ट, आजाराची लक्षणे, प्रसार व प्रतिबंध याविषयी जनजागृती. गर्भवतींसाठी विशेष तपासणी व समुपदेशन, शाळा-महाविद्यालयांत माहितीपर व्याख्याने, रुग्ण व कुटुंबियांसाठी समुपदेशन, विवाहपूर्व रक्त तपासणीचे महत्त्व पटवून देणारी मोहीम आखण्यात आली आहे.

हे तिन्ही आजार अनुवंशिक असून, तपासणीमुळे त्यांचे लवकर निदान शक्य होते. दोन्ही पती-पत्नी वाहक असल्यास त्यांच्या बाळामध्ये आजाराचा धोका वाढतो. नियमित तपासणी, वेळेवर उपचार आणि समुपदेशनामुळे आजाराचे दुष्परिणाम कमी करता येतात. सरकारकडून तपासणी व उपचाराची सुविधा उपलब्ध आहे. असे डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

## चोरट्यांनी ४ लाख केले लंपास

**पनवेल :** ज्येष्ठ नागरिकाच्या बॅगेतील चार लाख रुपये खेचून दोघे जण दुचाकीवरून पसार झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात ११ डिसेंबरला गुन्हा दाखल करण्यात आला.

सुबोधचंद्र मायाराम कलीता हे खारघर, सेक्टर २० येथे राहत असून, त्यांनी बँकेतून चार लाख रुपये फंडाची रक्कम काढली होती. ती रक्कम प्लास्टिकच्या बॅगमधून घेऊन ते घराकडे पायी जात होते. सेंट्रल पार्ककडे जाणाऱ्या रस्त्यावर पाठीमागून आलेल्या दोघांनी त्यांच्या हातातील पैशांची पिशवी खेचून पळून गेले.

## विमानतळ परिसरातील सुशोभिकरणाला वेग

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून २५ डिसेंबरपासून व्यावसायिक विमानांची सेवा सुरू होणार आहे. त्या अनुषंगाने विमानतळ परिसरातील रंगरंगोटी आणि रस्ते सुशोभीकरणाच्या कामांना वेग आला आहे.

विमानतळाकडे जाणाऱ्या मार्गावरील भिती, कम्पाउंड वॉल, फ्लायओव्हरखालील पॅनेल्स आणि रस्त्यालगतच्या संरचना नव्या डिसेंबरपासून व्यावसायिक विमानांची रंगसंगतीत नटविल्या जात आहेत. सिडकोने मुख्य कॉरिडॉरवर थीम-बेस्ड भित्तिचित्रे, कलात्मक पेंटिंग आणि स्वच्छ, एकसंध लूक देणाऱ्या रंगकामाची निवड केली आहे. विमानतळाकडे जाणाऱ्या उलवेतील मुख्य मार्गावरील दुभाजक, पदपथ, दिशादर्शक फलक आणि पथदिव्यांच्या रंगरंगोटीची कामे पूर्ण झाली आहेत. रस्त्याच्या रेखांकन पट्ट्यांचे नूतनीकरणही केले जात आहे.

**शाळेच्या शिक्षण परिषदेत ठराव** | **समिती अध्यक्ष जितेंद्र पाटील यांचा पुढाकार**

# मानिवली शाळेला हुतात्मा हिराजी पाटील यांचे नाव!

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील हुतात्मा हिराजी पाटील यांचे जन्मगावी असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळला हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील असे नामकरण करण्यात यावे, अशी मागणी करणारा ठराव केंद्र स्तरीय शिक्षण परिषदेत घेण्यात आला. मानिवली जिल्हा परिषद शाळेचे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जितेंद्र गवळी यांची नियुक्ती झाल्यानंतर हा ठराव घेण्यात आला आहे. हा ठराव तात्काळ कर्जत तालुका शिक्षण अधिकारी यांच्याकडे पाठवण्यात आला असून जिल्हा परिषदेच्या मंजुरीसाठी पाठवण्यात येणार आहे.



कर्जत तालुका पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या दहिवली तर्फे वरेडी केंद्र स्तरावरील शिक्षण परिषद हुतात्मा हिराजी पाटील यांचे जन्मगाव असलेल्या मानिवली येथे घेण्यात आली. त्यावेळी केंद्रप्रमुख नारायण सोनावणे यांच्यासह ग्रामपंचायत माजी सरपंच तुषार गवळी, लहूदास डायरे, जितेंद्र गवळी, प्रमिला गवळी आदींसह शाळांचे मुख्याध्यापक आणि शिक्षक उपस्थित होते. त्या ठिकाणी मानिवली जिल्हा परिषद शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या बैठकीत शाळेला हुतात्मा हिराजी पाटील यांचे देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर मानिवली येथील जिल्हा परिषद शाळेचे नाव ''रायगड जिल्हा परिषद वीर हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील शाळा मानिवली असे करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, अशी माहिती केंद्रप्रमुख नारायण सोनवणे यांनी दिली. आता हा प्रस्ताव दहिवली केंद्र प्रमुख यांच्याकडून कर्जत तालुका गटशिक्षण अधिकारी यांना पाठवण्यात आला.

शालेय व्यवस्थापन समितीचा कार्यकाल पूर्ण झाला असल्याने समिती पुनर्गठित करण्यासाठी पालक सभा घेण्यात आली. त्यात जितेंद्र गवळी यांना शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष करण्यात आले तर उपाध्यक्ष म्हणून प्रवीण डायरे यांची नियुक्ती सर्वानुमते घेण्यात आली.

शालेय व्यवस्थापन समिती सदस्य म्हणून सदस्य म्हणून तुषार गवळी,सुषमा किरण कराळे, प्रिया प्रवीण डायरे, अस्मिता देविदास डायरे, चंद्रकांत डायरे, हर्षदा गवळी, अर्चना अतुल कराळे, मेघा भारत भोईर, प्रमिला हिरामण गवळी, राजू डायरे, मनीष रावजी पाटील हे पालक तर शिक्षक प्रतिनिधी म्हणून संज्योती संतोष कांबरी,शिक्षण तज्ञ म्हणून लहूदास डायरे, विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून साई गवळी, श्रेया गवळी, सदस्य सचिव म्हणून शाळेचे मुख्याध्यापक परशुराम राठोड यांची नियुक्ती करण्यात आली.

# अशी ही फसवाफसवी

विधिमंडळाचे अधिवेशन रविवारी संपले. नागपुरात हिवाळी अधिवेशन घेऊन त्यात विदर्भाच्या प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न होईल असे आश्वासन संयुक्त महाराष्ट्राच्या वेळी देण्यात आले होते. पण मुख्यमंत्री नागपुरचे असूनही हे घडत नाही. चटावरचे श्राध्द उरकल्याप्रमाणे अधिवेशन भरवण्याच्या या फसवणुकीने यंदा कहर केला व ते केवळ एक आठवडा चालले. अगदीच टीका होऊ नये म्हणून रविवारीदेखील कामकाज ठेवले गेले. पण या सात दिवसांमधून विदर्भ किंवा महाराष्ट्रातील जनतेला काहीही मिळाले नाही. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीबाबतच्या लक्षवेधीचे छापील उत्तरदेखील वेळेत तयार नव्हते. यावरूनच सरकार जनतेबाबत किती बेदरकार झाले आहे हे कळावे. निवडणुका होऊन एक वर्ष झाले. पण सरकारने अजूनही विरोधी पक्षनेतेपद दिलेले नाही. गेल्या ६५ वर्षात हे पहिल्यांदाच घडले आहे. विरोधकांची संख्या कितीही असली तरी त्यांचा यापूर्वी कायमच सन्मान झाला आहे. याचा फायदा जनसंघ व भाजपलाही होता. पण आता देवेंद्र सरकारची वागणूक अत्यंत दुष्टपणाची आहे. राहुल नार्वेकर हे अध्यक्ष असले तरी भाजपचाच अजेंडा पुढे चालवतात की काय असे वाटते. अन्यथा, त्यांनी या प्रश्नी तात्काळ फैसला केला असता. पण नियम तपासून पाहत आहोत असे ठोकळेबाज उत्तर ते देतात. याच रीतीने त्यांनी शिवसेनेच्या पक्षफुटीच्या वेळी वेळकाढूपणा केला होता व त्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने त्यांची खरडपट्टी काढली होती. ठराविक दिवसात हा निर्णय घेण्याचा आदेश दिला होता. आता बहुदा विरोधी पक्षनेतेपदाबाबतही बहुदा कोणाला तरी न्यायालयातच जावे लागेल असे दिसते. दरम्यान, जे काय सात दिवस कामकाज चालले त्यातही सरकारच्या फसवाफसवीचे अनेक नमुने दिसले. सरकारच्या तिजोरीवर पैशांचा ताण असला तरी राज्य दिवाळ्यात निघालेले नाही असे मुख्यमंत्री व इतरांनी सतत सांगितले. रुग्ण कोमात असला तरी अजून वारलेला नाही असे सांगण्याचा ही अजब तऱ्हा म्हणायला हवी. भाकड गायींना अनुदान देण्याच्या प्रश्नावर अजित पवार यांनी शेवटच्या दिवशी बरीच चिडचीड केली ती पाहता सरकार आता स्वतःच्याच सापळ्यात अडकले आहे हे पुरेसे स्पष्ट झाले.

## गोशाळांची भानगड

गोशाळांबाबतचा प्रश्न विरोधकांनी चांगलाच गाजवला. गोशाळांच्या नावाखाली अनेक भानगडी चालतात, गायींची संख्या खोटी दाखवली जाते, गायींच्या नावाखाली म्हशींनाही धरून नेले जाते अशा अनेक तक्रारी करण्यात आल्या. गोशाळांचे ऑडिट होते का याबाबत शंका व्यक्त करून त्याबाबत आमदारांची समिती स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. तिला बगल दिली गेली. गोशाळांच्या नावाखाली प्रचंड भ्रष्टाचार चालू असून सत्तारुढ गटाच्या लोकांना ही दुकाने काढून देण्यात आल्याचे बोलले जाते. या गोशाळांना भाकड गायींच्या पालनपोषणासाठी सरकारकडून अनुदान मिळते. पण लाडकी बहीण योजनेप्रमाणेच यातही अनेक अपात्र किंवा अस्तित्वात नसलेल्यांनी फायदे उपटले आहेत. या गायींना बायोमेट्रिक ओळखपत्रे देण्याचा विचार केला जाईल असे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले. म्हणजे इतके दिवस पैशांचे पूर वाहिल्यानंतर आता सरकार काहीतरी केल्यासारखे दाखवणार आहे. ही सर्व धूळफेक आहे. दुसरीकडे अजित पवार यांनी थेट शेतकऱ्यांना अनुदान देण्याची मागणी मात्र फेटाळून लावली. गोशाळांचे ऑडिट करता येईल, प्रत्येक शेतकऱ्याचे ऑडिट कसे करणार असा सवाल त्यांनी केला. वरवर तो योग्य वाटत असला तरी बायोमेट्रिक तपासणी सुरू केली तर ती गोशाळेऐवजी शेतकऱ्यांच्या गोठ्यातही होऊ शकते. त्यासाठी गोशाळेचे मोठे खटले उभारून त्यावर खर्च करण्याची गरज नाही. पण यात सरळसरळ सरकारी पक्षाचे हितसंबंध दडलेले आहेत. पूर्वी दुष्काळामध्ये चारा छावण्या काढून त्यात भ्रष्टाचार करण्यात आला. नंतर शेणाच्या विक्रीतही भानगडी झाल्याचे आरोप झाले. आता कागदावर भाकड गायी दाखवून अनुदाने लाटण्याचे उद्योग चालू आहेत. एकेकाळी रोजगार हमी योजनेबाबत अशीच टीका होत असे. पण तिच्यातून निदान थोडी तरी उत्पादक कामे झाली. शिवाय, त्यातील भानगडींवर देखरेख करण्याच्या व्यवस्था निर्माण झाल्या. भाकड गायींचा प्रतिपाळ हा सगळाच भावनेचा मामला आहे. त्यात कोणी कोणाला अडवणार असा प्रश्न आहे.


## रोजगाराच्या नावाने फसवणूक

रोजगारांच्या प्रश्नावरूनही सरकार अशीच फसवाफसवी करीत असल्याचे दिसले. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या अंमलबजावणीवरून रविवारी मोठा गोंधळ झाला. सरकारी व विरोधी दोन्ही सदस्यांनी सरकारला खिंडीत पकडले. गेल्या वर्षी जुलैमध्ये ऐन निवडणुकीच्या तोंडावर पैसेवाटप करण्यासाठी ज्या अनेक योजना सुरू करण्यात आल्या त्यातलीच ही एक होती. बारावी व पदवी पूर्ण झालेल्या युवकांना वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये प्रशिक्षण दिले जाईल व प्रशिक्षण भत्ताही दिला जाईल असे त्यावेळी जाहीर झाले होते. अपेक्षा ही होती की, हे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर तरुणांच्या नोकरीची सोय व्हावी. प्रत्यक्षात असे काहीच झाले नाही. बारावी उत्तीर्णांना सहा हजार, आयटीआय व पदविकाधारकांना दरमहा आठ हजार आणि पदवीधारकांना १० हजार रुपये भत्ता देण्यात आला. तब्बल ५५ हजार विद्यार्थ्यांनी गेले ११ महिने या योजनेखाली भत्ता घेतला. यापैकी काहींना प्रशिक्षण मिळालेही असेल. पण त्यांच्यापैकी जवळपास कोणालाही नोकरी मिळालेली नाही. तूर्तास ही योजना बंद असून ती जानेवारीत पुन्हा चालू केली जायची आहे. त्यासाठी ४१८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. थोडक्यात, जिल्हा परिषद व महापालिका निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी याचा वापर केला जाणार आहे. भत्ता मिळाला, पण रोजगार कुठे आहे यावर सरकारने आता काखा वर केल्या आहेत. ही योजना केवळ प्रशिक्षणासाठी होती, त्यानंतर युवकांनी स्वतःचा रोजगार सुरु करावा अशी अपेक्षा आहे असे मंत्री लोढा यांनी सांगितले. पण निव्वळ कॉलेजची बीए, बीकॉम पदवी किंवा त्याहूनही कमी शिकलेले युवक स्वतःचा व्यवसाय सुरु करू शकतात व त्यावर पैसे कमावू शकतात असे म्हणणे हीच दिवाळखोरपणाची कमाल आहे. आपल्या पदवी वा बारावीच्या शिक्षणातून विद्यार्थ्यांना काहीही मिळू शकत नाही. आयटीआयच्या इलेक्ट्रिशियन वगैरे काही मोजक्या ट्रेडवाल्यांना स्वतःचा व्यवसाय शक्य आहे. पण त्यासाठी त्यांना सरकारी प्रशिक्षण वा भत्त्याची गरज नाही. एकूण सरकारी पैशाने तरुणांना निवडणुकीपुरते नादाला लावणे आणि त्यांची मते आपल्याकडे ओढून घेणे यासाठीच असल्या योजना आखल्या गेल्या असे दिसते. अर्थात, पंतप्रधान मोदींच्या नावाने वर केंद्रातही हेच चालू असून त्याचाच कित्ता राज्यात गिरवला गेला आहे. पीएम इंटर्नशिप योजनेच्या नावाखाली कंपन्यांनी प्रशिक्षणार्थी ठेवावेत, आम्ही त्यांचा भत्ता देऊ असे सांगितले गेले. त्यानुसार कंपन्यांनी ६० हजार उमेदवारांना तथाकथित प्रशिक्षण देऊ केले. पण ही ऑफर केवळ ८७०० युवकांनी स्वीकारली आणि त्यातले ४५०० उमेदवार प्रशिक्षण पूर्ण न करताच बाहेर गेले. याचाच अर्थ बहुसंख्य कंपन्यांनी या युवकांना हमाली कामांसाठी वापरून घेण्याचा प्रयत्न केला असावा. निवडणुकीच्या प्रचारात कोट्यवधी तरुणांना रोजगार देण्याच्या मोदींच्या दाव्याबाबतची ही वस्तुस्थिती आहे. एकूण दिल्ली ते गल्ली सर्वत्र ही फसवाफसवी चालू आहे.

विचार

# पर्यटन उद्योगात पायाभूत सुविधांवर भर

**देशात पर्यटकांची संख्या वाढते आहे. परदेशी पर्यटकांनाही भारताचे आकर्षण आहे. पर्यटनातून आर्थिक उलाढाल होते, रोजगार वाढतो. त्यामुळे आता वेगवेगळी राज्ये पर्यटनाकडे एक उद्योग म्हणून पाहू लागली आहेत. उत्तर प्रदेशने तर आताच २०४७ हे वर्ष समोर ठेवून पर्यटन विकास आराखडा तयार केला आहे. महाराष्ट्रात येत्या काळात कुंभमेळा असल्याने पर्यटन विकासाचा आराखडा तयार करून अंमलबजावणीवर भर दिला जात आहे.**



प्रा. सुखदेव बखळे

केंद्र सरकार गेल्या काही वर्षांपासून अर्थसंकल्पातच पर्यटनाच्या पायाभूत सुविधांच्या विकासाच्या घोषणा करत आहे. त्यातून रोजगार वाढवण्यावर भर दिला जात आहे. २००९ मध्ये पर्यटन मंत्रालयाने 'कौशल्य ते रोजगार' नावाची योजना सुरू केली; परंतु दुर्दैवाने त्याची फारशी चर्चा होत नाही. हा उपक्रम प्रामुख्याने शाळा सोडलेल्यांना लक्ष्य करत होता. त्यांना रोजगार किंवा स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण देण्याची ही योजना होती. 'हुनर से रोजगार तक' (एचएसआरटी) योजनेचे उद्दिष्ट बाजारपेठेशी संबंधित प्रशिक्षण देऊन शहरी गरिबांमध्ये स्वयंरोजगार आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणे हे होते. या माध्यमातून कुशल कामगारांच्या मागणी आणि पुरवठ्यातील दरी भरून काढण्याचा उद्देश आहे. असंघटित क्षेत्राला कौशल्य प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. या योजनेद्वारे तरुणांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न असूनही रोजगाराच्या नेमक्या संख्येत लक्षणीय तफावत कायम आहे. भारतातील पर्यटन क्षेत्राला बळकटी दिल्याने या योजनेची प्रभावीता वाढू शकते. त्यामुळे अधिक सहभागी आकर्षित होऊ शकतात आणि या महत्त्वाच्या उद्योगात रोजगाराच्या संधी वाढू शकतात. पर्यटन क्षेत्र हे देशातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या आर्थिक क्षेत्रांपैकी एक आहे. मार्क ट्रेन भारताबद्दल म्हणाले होते, की ही अशी भूमी आहे, जी सर्व पुरुषांना पाहण्याची इच्छा असते आणि ज्याने त्याची झलक पाहिली आहे तो जगातील इतर सर्व ठिकाणे पाहूनही ती विसरू शकत नाही. जागतिक आर्थिक मंचाच्या (डबल्यूईएफ) प्रवास आणि पर्यटन विकास निर्देशांक, २०२४ मध्ये भारताचे स्थान ३९ आहे. पर्यटनक्षेत्र भारताच्या जीडीपीमध्ये सात टक्के योगदान देते.

एप्रिल २००० ते डिसेंबर २०२३ या कालावधीमध्ये हॉटेल आणि पर्यटन उद्योगात एकत्रित 'एफडीआय इक्विटी'चा प्रवाह १७.१ अब्ज अमेरिकन डॉलर्स होता. तो विविध क्षेत्रांमध्ये मिळालेल्या एकूण एफडीआयच्या २.५७ टक्के होता. 'इंडिया ब्रँड इक्विटी फाउंडेशन' (आयबीईएफ) च्या पर्यटन आणि आतिथ्य उद्योगाच्या वाढीच्या अहवालानुसार, प्रवास आणि पर्यटन हे भारतातील दोन सर्वात मोठे उद्योग आहेत, जे देशाच्या जीडीपीमध्ये अंदाजे १७८ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे योगदान देतात. प्रवास आणि पर्यटनामुळे ३२.१ दशलक्ष रोजगार निर्माण झाले, जे २०२१ मध्ये एकूण रोजगाराच्या ७.५ टक्के होते. आतिथ्य उद्योग (हॉटेल, रेस्टॉरंट्स आणि ट्रॅव्हल एजन्सीसह) लाखो लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार प्रदान करतो. देशांतर्गत पर्यटन ही या उद्योगासाठी एक प्रेरक शक्ती आहे, २०१९ मध्ये १.८ अब्ज पेक्षा जास्त देशांतर्गत पर्यटकांनी प्रवास केला आणि अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान दिले. पर्यटन मंत्रालयाच्या मते डिसेंबर २०२३ मध्ये परदेशी पर्यटकांच्या आगमनाची (एफटीए) संख्या १,०७०,१६३ इतकी नोंदवली गेली. जानेवारी-डिसेंबर २०२३ या कालावधीमध्ये परदेशी पर्यटकांची संख्या ९,२३६,१०८ इतकी नोंदवली गेली. ती जानेवारी-डिसेंबर २०२२ मध्ये ६,४३७,४६७ होती. परदेशी पर्यटकांच्या दृष्टीने लोकप्रिय स्थळांमध्ये आग्रा येथील ताजमहाल, अमृतसर येथील सुवर्णमंदिर, गोव्याचे समुद्रकिनारे, केरळचे बॅकवॉटर आणि हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडची टेकडी यांचा समावेश आहे. आता त्यात उत्तर प्रदेशातील अयोध्येतील राम मंदिराची भर पडली आहे.

गेल्या दोन वर्षांमध्ये अयोध्येला जाणाऱ्या पर्यटकांची संख्या पाहिली, तर हे देवस्थान देशात उत्पन्नाच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकावर आले आहे. अयोध्येत पर्यटनाच्या पायाभूत सुविधा निर्माण केल्याचा हा परिणाम आहे. लोकांच्या धार्मिक भावनांचा विचार करूनही पर्यटन वाढवता येते आणि लोकांच्या खिशातून अलगद पैसा काढता येतो, त्यासाठी कला लागते. देशाच्या लांब किनारपट्टीवर विविध आकर्षक समुद्रकिनारे आहेत. याव्यतिरिक्त, भारतातील प्रवास बाजार आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत १२५ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे, तर २०२८ पर्यंत आंतरराष्ट्रीय पर्यटकांचे आगमन ३०.५ दशलक्ष पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. २०२९ पर्यंत या क्षेत्रामध्ये अंदाजे ५३ दशलक्ष नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा आहे. देशाच्या जीडीपीमध्ये या उद्योगाचे थेट योगदान २०१९ ते २०३० दरम्यान वार्षिक ७-९ टक्के वाढीचा दर नोंदवण्याची अपेक्षा आहे. विमानतळ पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा आणि पासपोर्टची उपलब्धता वाढल्यामुळे आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत भारतीय विमान वाहतूक बाजार अंदाजे २० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. २०२७ पर्यंत हे प्रमाण जवळपास दुप्पट होऊ शकते. भारतीय हॉटेल बाजारपेठ आर्थिक वर्ष २०२० मध्ये ३२ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी होती आणि आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत ५२ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. प्रवाशांची वाढती मागणी आणि बाजारपेठेला चालना देण्यासाठी ट्रॅव्हल एजंट्सच्या सततच्या प्रयत्नांमुळे हे अपेक्षित आहे.

महाराष्ट्राने पर्यटन विकासावर भर दिला आहे. नाशिक येथे पुढच्या वर्षात कुंभ मेळा होणार आहे. त्यासाठी आतापासूनच पायाभूत सुविधांची निर्मिती केली जात आहे. सुमारे तीन हजार कोटी रुपये खर्चून विविध कामे हाती घेतली जात आहे. आणखी निधी लागल्यास त्याचीही तयारी आहे. कुंभमेळ्यासाठी येणारे भाविक शिर्डीलाही येतात. त्यामुळे नाशिकपासून शंभर किलोमीटरच्या परिसरात धार्मिक पर्यटन वाढेल, असा अंदाज आहे. त्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहेत. राज्याचे पर्यटन संचालनालय विद्यमान पर्यटन धोरण चौकटीत वाढ करण्याची आशा करत आहे. 'महाटुरिझम' शाश्वत विकास आणि जबाबदार पर्यटन पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी प्रोत्साहने देत आहे. महाराष्ट्रात पर्यटकांचा ओघ वाढवण्याच्या उद्देशाने टूर पॅकेजेससाठी प्रोत्साहने द्यायला सुरुवात झाली आहे. हॉटेल व्यावसायिकांना आणि पर्यटन उद्योगाला पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल. मुंबई महोत्सवासारख्या उपक्रमांद्वारे शाश्वततेला प्रोत्साहन देत आहे. प्लास्टिकमुक्त कार्यक्रम आणि शाश्वत विकासासाठी संयुक्त राष्ट्रांसारख्या संस्थांशी सहकार्य हे पर्यावरणपूरक पर्यटन पद्धतींबद्दलची देशाची वचनबद्धता अधोरेखित करते. अलीकडेच सुरू झालेल्या 'एएआय'धोरणामुळेही या उपक्रमांना बळकटी मिळाली आहे. त्याचा उद्देश हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे आणि पर्यटनात लिंग समावेशकता वाढवणे आहे. यासाठी सुमारे ३५ इरादा पत्रे आधीच जारी करण्यात आली असून धोरणाचा सक्रियपणे प्रचार केला जात आहे. त्यात लक्षणीय रस दिसून येत आहे. महिला प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी आता सवलती दिल्या आहेत. पर्यटन मंत्रालयाचे अधिकारी दीडशे प्रस्तावांसह पन्नास स्थळांना अंतिम रूप देण्याची आणि विकसित करण्याची तयारी करत आहे. भारत सरकारच्या पर्यटन महासंचालक मनीषा सक्सेना यांनी परदेशी कार्यालयांचे एकत्रीकरण, क्षमता बांधणी, स्थानिक सहभागाची भूमिका आणि मंत्रालयासाठी फायदेशीर इतर उपक्रमांबाबत तपशीलवार माहिती दिली. याव्यतिरिक्त २०२४ पर्यटन अजेंड्यामध्ये विभाग-विशिष्ट धोरणेदेखील समाविष्ट आहेत. पर्यटनातील पार्किंग समस्यांसारख्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि लोकप्रिय तीर्थस्थळांव्यतिरिक्त अष्टविनायकसारख्या कमी ज्ञात धार्मिक स्थळांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. याव्यतिरिक्त, विविध पर्यटन पोर्टफोलिओचा भाग म्हणून कृषी पर्यटन, ग्रामीण पर्यटन आणि आदिवासी पर्यटनाला सक्रियपणे प्रोत्साहन दिले जात आहे. महाराष्ट्र देशांतर्गत पर्यटकांच्या आगमनात सहाव्या क्रमांकावर तर परदेशी पर्यटकांच्या आगमनात दुसऱ्या क्रमांकावर आहे. भविष्यात महाराष्ट्र पर्यटन पारंपारिक योजनांच्या पलीकडे विस्तार करण्याचा विचार करत आहे. वाइन पर्यटन केंद्रांनी नाशिकपाठोपाठ जुन्नर आणि सोलापूरसारख्या ठिकाणी वाइन महोत्सवांसारख्या यशस्वी उपक्रमांची पुनरावृत्ती केली. हे प्रयत्न विद्यमान पर्यटन कार्यक्रमांमध्ये वैविध्य आणण्याच्या उद्देशाने दूरदर्शी ठरतात.

**(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

# शेतकऱ्यांचा विचार करणे गरजेचे

प्रमोद जाधव



झाडाच्या बाजूला असलेले गवत काढणे, सुकलेल्या फांद्या काढणे, झाडाच्या बाजूला खड्डा करून त्यावर पालापाचोळा टाकून सेंद्रीय खत तयार करणे, फवारणी करणे, आंबे काढणे, पेटीत ठेवणे, त्याची वाहतूक करणे अशा अनेक प्रकारची कामे शेतकऱ्यांना करावी लागतात. त्यामुळे साधारतः एक लाख रुपयांपेक्षा अधिकचा खर्च करावा लागतो. आपल्या जीवाची पर्वा न करता, शेतकरी शेतात राबतात. मात्र त्यांना विम्याचा हप्ता इतर जिल्ह्याच्या तुलनेने दुप्पट तिप्पट भरवा लागत आहे. त्यामुळे रायगडच्या शेतकऱ्यांचा विचार शासनाने करणे गरजेचे आहे. बोटावर मोजण्या इतक्या शेतकऱ्यांकडे एकरी जमीन अन्य शेतकऱ्यांकडे गुंठ्यावर जमीन आहेत. त्यामुळे विमा हप्ता ठरविताना शेतकऱ्यांच्या हिताचा विचार होणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळावे, म्हणून शासनाने आंबिया बहार फळपिक विमा योजना सुरू केली आहे. प्रति हेक्टरी १४ हजार ४५० रुपये विमा हप्ता जिल्ह्यासाठी आहे. मात्र सिंधूदूर्ग जिल्हयात हा हप्ता सात हजार रुपये इतका असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे रायगड जिल्हयातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांवर शासनाने मोठे अन्याय केल्याची प्रतिक्रीया उमटत आहे. जिल्ह्यात बऱ्याच शेतकऱ्यांच्या जमीनी गुंठावारी असून बोटावर मोजण्याइतक्या शेतकऱ्यांची जमीनी एकरीत आहेत. शासनाच्या या जाचक नियमावलीमुळे शेतकऱ्यांचे हाल आणि विमा कंपन्या मालामाल अशी परिस्थिती दिसून येत आहे

रायगड जिल्ह्यामध्ये अलिबाग, रोहा, मुरूड, श्रीवर्धन, माणगांव, म्हसळा या तालुक्यात मोठ्या प्रमाणात आंब्याची लागवड केली जाते. जिल्ह्यामध्ये १७ हजार हेक्टर इतके आंब्याचे क्षेत्र असून, १३ हजार ५०० हेक्टर उत्पादनक्षम क्षेत्र आहे. जिल्ह्यात ५६ हजारहून अधिक आंबा उत्पादक शेतकरी आहेत. गेल्या अनेक वर्षापासून आंबा उत्पादक शेतकऱ्यांना अवकाळी पावसाचा बसत आहे. शेतकऱ्यांना फळपीक विम्यातून आर्थिक बळ मिळावे यासाठी सरकारने पुर्नरचित हवामान अधारित फळपिक विमा योजना सुरू केली आहे. अंबिया बहार ही योजना सुरू केली. मुंबई येथील युनिव्हर्सल सम्पो जनरल इन्शुरन्स, कंपनीची यासाठी नेमणूक करण्यात आली आहे. या अंतर्गत नैसर्गिक आपत्ती व हवामान प्रतिकूल परिस्थितीमुळे फळ पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रति हेक्टरी १४ हजार ४५० रुपये विम्याचा हप्ता ठरविण्यात आला आहे.


उत्पादनक्षम फळबागांसाठी विमा संरक्षण लागू राहणार आहे. यासाठी आंबा पिकाचे उत्पादन क्षम वय पाच वर्षे असणेर आवश्यक आहे. फळ पिकासाखील कमीत कमी दहा गुंठे असणे आवश्यक आहे. एक डिसेंबर ते ३१ मे या कालावधीत अवकाळी पाऊस व कमी- जास्त तापमान, वेगाचा वारा आदीचा फटका बसल्यास एक लाख ७० हजार रुपये तसेच गारपिटचा फटका बसल्यास ५७ हजार रुपयांची विमा संरक्षित रक्कम दिली जाणार आहे. जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळावे, यासाठी राबविण्यत आलेली योजना चांगली असली, तरी या योजनेसाठी असणारा विमा हप्ता भरमसाठ असल्याची माहिती समोर येत आहे. हा विमा हप्ता कमी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी वारंवार शासनाकडे पाठपुरावा केला आहे. याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.गेल्या दोन वर्षापूर्वी अवकाळी पावसामुळे सुमारे सात हजार ८५०आंबा उत्पादक शेतकऱ्यांना फटका बसला होता. त्यामध्ये सुमारे चार हजार हेक्टरहून अधिक क्षेत्राचे नुकसान झाले होते.

रायगड जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांपैकी सात हजार ४५६ शेतकऱ्यांनी फळ पीक विम्यासाठी नोंदणी केली होती. दिवाळीत विम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले होते. परंतु ही रक्कम तुटपुंजी असल्याने शेतकरी नाराज झाले होते. अवकाळी पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे दोन लाखापासून तीन लाखापर्यंतचे नुकसान झाले. मात्र, त्यांना फक्त ७० हजारपासून ७५ हजार रुपयांपर्यंत विम्यामार्फत भरपाई मिळाले होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी घोर निराशा व्यक्त केली होती. देखभाल दुरुस्तीचा खर्चदेखील यातून निघाला नसल्याचे काही शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले. त्यामुळे विमा हप्ता भरमसाठ आणि शेतकऱ्यांसाठी मिळणारे विमा नुकसान भरपाई तुटपुंजी अशी परिस्थिती निर्माण होण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. शासनाचा उपक्रम चांगला असला, तरी विमा कंपन्या यातून मालामाला होत असल्याची चर्चा गावागावात सुरू आहेत. शेतकऱ्यांच्या समस्यांचा विचार करून विमादेण्याची कार्यवाही केल्यास शेतकरी अधिक सक्षम बनेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

लोकसंसद

## क्रिकेटवेड्या देशात लिओनेल मेस्सीचे अभूतपूर्व स्वागत

ग्रेटेस्ट ऑफ ऑल टाइम-जीओएटी इंडिया टूरचा भाग म्हणून २०११ नंतर तब्बल १४ वर्षांनी भारताच्या दौऱ्यावर आलेला अर्जेंटिनाचा जगप्रसिद्ध फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी याची एक झलक पाहण्यासाठी जमलेल्या कोलकात्याच्या हजारो फुटबॉल चाहत्यांची तो न दिसल्याने निराशा झाली. त्यानंतर संतापलेल्या चाहत्यांकडून स्टेडियममध्ये तोडफोड होऊन कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. कोलकात्याला, पुढच्यास ठेच लागल्यानंतर शहाणा झालेल्या हैदराबादमध्ये आणि मुंबईमध्ये सुरक्षा व्यवस्था कडक केल्यामुळे मेस्सीचे कार्यक्रम अगदी सुरळीतपणे पार पडले. दोन्ही ठिकाणी हजारो चाहत्यांनी मेस्सीचे जल्लोषात स्वागत केले. मुंबईतील ऐतिहासिक वानखेडे स्टेडियममध्ये



क्रिकेटचा देव गणला गेलेला सचिन तेंडुलकर आणि फुटबॉलचा जादूगार मानला गेलेला लिओनेल मेस्सी यांची भेट झाल्यानंतर चाहत्यांनी अख्खे स्टेडियम डोक्यावर घेत सचिन...सचिन आणि मेस्सी...मेस्सी अशा गजराने दणाणून सोडले. या वेळी मेस्सीसोबत उपस्थित असलेले त्याचे सहकारी लुईस सुआरेझ आणि रॉड्रिगो डी पॉल हे देखील प्रेक्षकांच्या या प्रेमाने भारावून गेले. विशेष म्हणजे भारत आजवर 'फिफा' या फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत कधीच खेळलेला नाही. कारण भारतात क्रिकेटपुढे इतर खेळांप्रमाणेच फुटबॉल हा खेळ सर्वच बाबतीत काहीसा मागेच आहे. मात्र या क्रिकेटवेड्या देशात झालेल्या अभूतपूर्व स्वागताने आश्चर्य चकित झालेला मेस्सी भारावून गेला.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# सर्वांचा लाडका, हरहुन्नरी 'लक्ष्या'

जवळपास दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज स्मृतिदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षाच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज - सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटकाप्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला . त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही. कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबाज, थरथराट, दे दणादण, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघानी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या मराठीतच. पु.ल. देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

# डिसेंबरमध्येच विहिरी कोरड्या

## अनेक वाड्या-पाड्यांवर भीषण पाणीटंचाई; पाण्यासाठी पायपीट

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

मुंबईकरांची तहान भागवणारा तालुका म्हणून शहापूरची ओळख आहे. मात्र सरकारी अनास्थेमुळे धरण उशाला आणि कोरड घशाला अशी अवस्था या तालुक्याची झाली असून यंदा डिसेंबर महिन्यातच शहापूरकरांचा घसा कोरडा पडला आहे. अनेक वाड्यापाड्यांवर भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. विहिरी कोरड्या ठाक पडल्या आहेत. हातपंपांना टिपूस नाही अशी भयंकर परिस्थिती उद्भवली आहे. त्यामुळे कडाक्याच्या थंडीतही आदिवासींना हंडे, कळशा घेऊन पाण्यासाठी दोन-दोन किमीची पायपीट करावी लागत आहे.



शहापूर तालुक्यात साधारणतः फेब्रुवारीमध्ये पाणीटंचाई जाणवू लागते. मात्र यंदा पावसाने तब्बल पाच महिने मुक्काम ठोकूनही डिसेंबरच्या सुरुवातीलाच कसारा भागातील पारधवाडी, नारळवाडी व पायरवाडी या तीन वाड्यांवर पाणीटंचाईचे भीषण संकट कोसळले आहे. या तीनही पाड्यांवरील विहिरींमध्ये पाण्याचा ठणठणाट झाला असून हातपंप व अन्य पाण्याचे स्रोत आटल्याने तेथील माताभगिनींना डोक्यावर चार-चार हंडे घेऊन तब्बल दोन किमी लांब असलेल्या कळमांजरा दरीतून पाणी आणावे लागत आहे. गावातील दमछाक करणाऱ्या समस्यांमध्ये पाण्याची भर पडली आहे.

शाळा आणि रोजगारासाठी जावे तर तहानेने जीव व्याकुळ होतो, अशी बिकट अवस्था टंचाईग्रस्त वाड्यांची झाली आहे. पाणीटंचाईचा तालुका अशी ओळख झालेल्या शहापूर तालुक्यात आता टप्प्याटप्प्याने टंचाईग्रस्त गावपाड्यांची संख्या वाढणार असून माताभगिनींची पाण्यासाठी मैलोन्‌मैल वणवण सुरू होणार आहे.

### पाणीयोजनांवर कोट्यवधी रुपये खर्च

विविध पाणीयोजनांवर, त्यांच्या दुरुस्तीवर कोट्यवधी रुपये खर्च करूनही पाणीटंचाईचा प्रश्न सुटलेला नाही. दरवर्षी टँकरद्वारे पाणीपुरवठा करून त्यावरदेखील कोट्यवधी रुपये खर्च केला जातो. तालुक्याच्या दुर्गम भागातील पाणीटंचाईचा प्रश्न कायम सुटावा यासाठी इगतपुरी तालुक्यातील भावली धरणातून पाणी योजना राबवण्यात येत आहे. मात्र झारीतील शुक्राचार्यांमुळे या योजनेमध्ये अडथळे येत असल्याने भावली योजनेत आतापर्यंत खर्च करण्यात आलेले कोट्यवधी रुपये पाण्यात जातात की काय, अशी शंका व्यक्त होत आहे.

### शिक्षणासह रोजगारही बुडतो

पाणीटंचाईमुळे तेथील ग्रामस्थ माताभगिनींच्या रोजगारावर गदा आली असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचाही प्रश्न निर्माण झाला आहे. पाण्यासाठी मुलांना सोबत घेऊन जावे लागत असल्याने शाळेला दांडी होते आणि रोजगारही बुडतो.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१६ डिसेंबर**

१) श्री.प्रेमजी बालन डेडीया
अलिबाग, १६-१२-१९५०
२) श्री.काशिनाथ सखाराम वरसोलकर
कोळीवाडा, अलिबाग,
१६-१२-१९५२

## ‘पागडी पुनर्विकासाचे धोरण फसवे’

**मुंबई :** मुंबईसाठी आम्ही ठोस मागण्या मांडल्यानंतर सत्ताधाऱ्यांची धावपळ सुरू झाली असून त्यांच्या सर्व घोषणांची आज चिरफाड करणार आहोत, असे युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांनी सांगितले. पागडी पद्धतीतील रहिवाशांना ऑक्युपंटचा दर्जा देऊन कायदेशीर संरक्षण मिळाले पाहिजे. तसेच न्यायालयासमोर म्हाडा



हे सक्षम प्राधिकरण असल्याचे सरकारने स्पष्ट करावे, अशी मागणी त्यांनी केली. पागडी पुनर्विकासाचे सध्याचे धोरण फसवे असून यात टेनंटला मर्यादित लाभ आणि बिल्डरला जादा सवलती दिल्या जात असल्याचा आरोप करत आदित्य ठाकरे यांनी भाजपवर टीका केली. मुंबईतील पोलीस वसाहतींमध्ये पोलीस कर्मचाऱ्यांना दर्जेदार घरे देणे, दंडनीय शुल्क कमी करणे, तसेच टेनंटला पुनर्विकासासाठी कायदेशीर हक्क देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. सरकारने मुंबईतील जुन्या व सेस इमारतींच्या पुनर्विकासाबाबत स्पष्ट आणि न्याय्य धोरण जाहीर करावे, अशी ठाम मागणीही त्यांनी केली आहे.



## स्काय वॉकची सुरक्षा वाऱ्यावर

**। पालघर । प्रतिनिधी ।**

वसई-विरारशहरातउभारण्यात आलेले स्कायवॉक घाणीच्या विळख्यात सापडल्या आहेत. यातील विरार येथील स्कायवॉक सतत वादाच्या भोवऱ्यात असतो. विरार पश्चिमेकडील वाहतुकीत अडथळा निर्माण होण्याबरोबरच प्रशासनाकडून दुर्लक्ष झाल्याने येथे मोठ्या प्रमाणात घाण साचली आहे. मार्गिकेखाली दोन्ही बाजूंना दारूची दुकाने असल्याने अनेक मद्यपी येथेच दारू पिताना दिसून येतात. अशीच परिस्थिती वसई येथील स्कायवॉकवरही आहे. या ठिकाणी फेरीवाल्यांनी आपले बस्तान मांडले आहे. तसेच देहविक्री करणाऱ्यांची हालचाल वाढल्याने सामान्य महिलांना याचा सतत त्रास सहन करावा लागत आहे. दोन्ही मार्गिकांवर सुरक्षारक्षक नसल्यामुळे विविध गैरप्रकारांना मोकळे मैदान मिळाले आहे. या स्कायवॉकवर साफसफाई करून रंगरंगोटी करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## मेट्रो स्थानकाचे नामकरण ‘पेणकर पाडा’ व्हावे

### सक्षम प्रतिष्ठानची मागणी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

स्थानिक नागरिकांना, भूमिपुत्रांना विश्वासात न घेता एमएमआरडीएच्या वतीने मेट्रो स्थानकाला सुचवण्यात आलेल्या ‘पांडुरंग वाडी’ या नावाला सक्षम युवा प्रतिष्ठानने विरोध दर्शविला आहे. त्यामुळेच मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रातून जाणाऱ्या मेट्रो स्थानकांच्या नावावरून नवा वाद निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत.

बरेचदा नामकरण हा मुद्दा भावनाप्रधान ठरत असतो. यामुळेच नामकरणाबाबत वेगवेगळे मतप्रवाह असलेल्या नागरीकांमधील वाद विकोपाला जाण्याची शक्यता असतात. याचा विचार करून एमएमआरडीएने स्थानकाचे नामकरण करताना वर्षानुवर्षे त्या भागात राहणारे मूळ रहिवासी, स्थानिक नागरीक यांना विश्वासात घेऊन सर्वसमावेशक निर्णय घ्यावा, असे सक्षम युवा प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. सक्षम युवा प्रतिष्ठानने यासंदर्भात स्थानिक आमदार नरेंद्र मेहता यांची भेट घेऊन मिरा भाईंदर मेट्रो क्र ९ मधील पांडुरंगवाडी स्थानकाच्या नावाला विरोध दर्शवत पेणकर पाडा असे नामकरण व्हावे, याबाबत आपली भूमिका मांडत सविस्तर निवेदनही सादर केले. याप्रसंगी सक्षम युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड.नितेश म्हात्रे, कार्याध्यक्ष ॲड.अविनाश सुर्यवंशी, खजिनदार भूषण कोळी उपस्थित होते.

> “पांडुरंग वाडी हे त्या भागातील एका मर्यादित परिसराचे नाव आहे. परंतु पेणकरपाडा हे नाव मिराभाईंदर महानगरपालिकेच्या आणि महसूल विभागाच्या नोंदीमध्ये सुमारे ४० ते ५० वर्षांहून अधिक काळापासून अधिकृतपणे नमूद असून या गावाला स्वतंत्र असा सामजिक, प्रशासकीय, ऐतिहासिक वारसा लाभला आहे. ही बाब लक्षात घेता स्थानकाचे नामकरण पेणकर पाडा असेच व्हावे ही पेणकर पाड्यातील समस्त नागरिकांची आग्रही मागणी आहे.
> – ॲड नितेश म्हात्रे, अध्यक्ष, सक्षम युवा प्रतिष्ठान”

## माजी विद्यार्थ्यांची कुलाबा किल्ल्याला भेट

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

महाड तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल वाळण येथील १९८८-८९ च्या बॅचमधील काही माजी विद्यार्थ्यांनी रविवारी (दि.१४) अलिबाग येथील कुलाबा किल्ल्याला भेट दिली. याभेटी दरम्यान ॲड. कैलास पवार, उद्योजक प्रशांत कालगुडे, माजी सैनिक चंद्रप्रकाश ओमले, प्रकाश जाधव, रविंद्र कालगुडे, गंगाराम गोडावळे, विक्रम उत्तेकर, विठ्ठल बेंदुगडे, शांताराम कालगुडे, वाहन चालक संदिप नरे आदि उपस्थित होते.

जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग येथे कार्यरत असलेले बेंदुगडे यांच्या विनंतीस



मान देऊन सर्व माजी विद्यार्थी अलिबाग येथे कुलाबा किल्यास भेट देण्याकरिता आले होते. त्यानुसार त्यांनी अलिबाग येथील विविध ठिकाणच्या बीच, पर्यटन स्थळाला भेट देऊन आपला आनंद व्यक्त केला.

यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांनी चर्चासत्रात विविध विषयांवर आपली मनोगते व्यक्त केली. तसेच या भेटीदरम्यान सर्व मित्रांनी अलिबाग येथील विविध ठिकाणच्या बीच, पर्यटन स्थळाला भेट देऊन मनमुराद आनंद घेतला. दुपारी स्नेहभोजन करुन सर्व मित्रमंडळी आपल्या महाड तालुक्यातील मूळ गावी जाण्यासाठी निघाले.

## जुन्या वादातून तरुणाची हत्या

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

जुन्या वादातून तरुणाची हत्या केल्याची धक्कादायक घटना डोंबिवलीत घडली आहे. नरेंद्र जाधव असे मृत तरुणाचे नाव आहे. आकाश बिराजदार याने साथीदारांसह ही हत्या केली. पूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून आकाश बिराजदार याने आपल्या साथीदारांसह नरेंद्र जाधव याच्यावर प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात नरेंद्र गंभीर जखमी झाला. त्याला रुग्णालयात दाखल करताच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच रामनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

## महालक्ष्मी मंदिरात भाविकांची गर्दी

**। पालघर । प्रतिनिधी ।**

डहाणू तालुक्यातील विवळवेढे येथील प्रसिद्ध महालक्ष्मी देवीच्या मंदिरात रविवारी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. रविवारची सुट्टी आणि पवित्र मार्गशीर्ष महिना यांचा योग जुळल्याने सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांचा महासागर लोटला होता. यामुळे मंदिराचा संपूर्ण परिसर भक्तिमय उत्साहाने फुलून गेला होता. या प्रचंड गर्दीमुळे कोणतीही अनुचित घटना घडू नये आणि सुव्यवस्था कायम राहावी यासाठी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. कासा आणि तलासरी पोलिसांनी मोठ्या फौजफाटा तैनात करून गर्दीचे नियोजन केले. तसेच, मंदिर प्रशासनाकडूनही भाविकांच्या सोयीसाठी पिण्याचे पाणी, रांगेचे व्यवस्थापन आणि इतर आवश्यक उपाययोजना प्रभावीपणे करण्यात आल्या होत्या.



## ‘जनतेच्या प्रश्नांकडे सत्ताधाऱ्यांचे दुर्लक्ष’

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

नागपूरचे हिवाळी अधिवेशन अवघे एक आठवड्याचे घेऊन भाजपा महायुती सरकारने विदर्भ कराराचा अनादरच केला आहे. शेतकरी, कामगार, बेरोजगार, कायदा सुव्यवस्था, भ्रष्टाचार महिला सुरक्षा यासारखे असंख्य प्रश्न असताना अधिवेशनात त्यावर चर्चा होत नाही आणि कुठे कुत्री पकडा, बिबटे सोडा यावर चर्चा होत आहे. सत्ताधारी पक्षाला अधिवेशनाचे काही गांभिर्यच राहिलेले नाही, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

नागपूर विधान भवनात प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, भाजपा महायुती सरकारच्या काळात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. दररोज भ्रष्टाचाराची एक एक प्रकरणे उघड होत आहेत. पैशांचा सुळसुळाट सुरु आहे. भ्रष्टाचार हेच सरकारचे ब्रिद वाक्य आहे. ‘न खाऊंगा, न खाने दुंगा’पासून झालेली सुरुवात आता ‘मिल बाट के खायेंगे’ पर्यंत आली आहे.

## श्रमदानातून उभारले वनराई बंधारे

### रब्बी हंगामातील पिकांसाठी पाणी उपलब्ध होणार

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील नाडसुर ग्रामपंचायत हद्दीतील धोंडसे, पोटलज खुर्द आणि महागाव परिसरात ग्रामस्थ, शेठ जे. एन. पालीवाला महाविद्यालयाचे एनएसएस विद्यार्थी, शिक्षक आणि तालुका कृषी विभागाच्या संयुक्त पुढाकारातून श्रमदानातून वनराई बंधारे उभारण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरातील भूजल पातळी वाढण्यास मदत होणार असून, पाण्याचे शाश्वत स्रोत निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



धोंडसे गावात रविवारी (दि.१४) उभारण्यात आलेल्या बंधाऱ्याचे काम तालुका कृषी अधिकारी दयावंती कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. यामध्ये एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. सर्जेराव पाटील, डॉ. अनिल झेंडे, लीनताज उके, सहाय्यक कृषी अधिकारी कंठाळे, गलांडे, बोराडे, शेतकरी अविनाश खंडागळे आणि ग्रामस्थांनी सहभाग घेतला. दगड, माती, रिकाम्या सिमेंटच्या पिशव्या यांचा वापर करून अत्यल्प खर्चात बंधारा उभारण्यात आला. या बंधाऱ्यामुळे परिसरातील गाई, गुरे, मोकाट जनावरे आणि पक्ष्यांना पाण्याचा आधार मिळणार असून, शेतकऱ्यांना भाजीपाला व रब्बी हंगामातील पिकांसाठी पाणी उपलब्ध होणार आहे.

या बंधाऱ्यामुळे आजूबाजूच्या विहिरी, बोअरवेल्स यांची पातळी वाढण्यास मदत होणार असून, जमिनीतील ओलावा टिकून राहील. विशेषतः वाल, मुग, मटकी यांसारख्या कडधान्य पिकांच्या उत्पादनात वाढ होण्याची शक्यता आहे. यावेळी पोटलज खुर्द येथील महिला व पुरुषांनी मोठ्या संख्येने श्रमदानात सहभाग घेतला. कृषी सेवक बोराडे एस.बी. हेही उपस्थित होते.

### शिवप्रेमींकडून स्वच्छता, संवर्धन | शेकडो तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग

# पद्मदुर्ग किल्ल्याने घेतला मोकळा श्वास

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड पद्मदुर्ग जागर व गड भ्रमण सामाजिक संस्थांच्या वतीने शनिवारी (दि.१३) शेकडोच्या संख्येने बोटीतून पद्मदुर्ग किल्ल्यात बोटीने आगमन केले. प्रथम शिवप्रेमींनी दुर्गादेवी कोटेश्वरी मातेची पूजा केली. त्यानंतर गडाचे पूजन करुन स्वच्छता व संवर्धन सुरुवात करण्यात आली. ‘छत्रपती शिवाजी महाराज की जय’, ‘धर्मवीर संभाजी महाराज की जय’, ‘जय भवानी जय शिवाजी’, ‘हर हर महादेवा’चा घोषणा देत स्वच्छता मोहीमेला सुरुवात करण्यात आली. यावेळी तरुणींनी स्वच्छता सहभाग नोंदवुन महाराजांना मानवंदना देण्यात आली.

यावेळी पद्मदुर्ग जागर व गड भ्रमण सामाजिक संस्था मुरुड



अध्यक्ष आशिलकुमार ठाकूर, उपाध्यक्ष राहुल दत्तात्रेय कासार, सचिव महेंद्र मोहिते, सल्लागार विजय वाणी, पुजा बेडेकर, संजना पाटील, अंकिता कमाने, रुपेश जामकर, योगेश सुर्वे, महेश साळुंखे, सतेज विरकूड, अच्युत चव्हाण, बाबू घरत, सुनील शेळके, मिलिंद भगत, अविनाश भगत, संदेश म्हात्रे, प्रकाश चव्हाण, प्रकाश वाडकर, अमित पाटील, प्रमोद मसाल, नेहा पाके, खार अंबोली गडप्रेमी ग्रुप, विहूरचे गडप्रेमी, रामराजचे गडप्रेमी इत्यादी शिवप्रेमी उपस्थित होते.

यावेळी पद्मदुर्ग जागर व गड भ्रमण सामाजिक संस्था मुरुड अध्यक्ष आशिलकुमार ठाकूर यांनी स्वच्छता मोहीमत सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले होते.

या आवाहनाला शिवप्रेमींनी चांगला प्रतिसाद देऊन कोयता, झाडू, पारय, पंजा, टिकाव, फावडे इत्यादी साहित्य घेऊन किल्ला स्वच्छतेला सुरुवात केली. गडावरील तोफा स्वच्छता करण्यात आल्या. गडावरील मोठ मोठी झाडे तोडण्यात आली. तुटलेल्या दगडी पायऱ्या बसविणे, गवत काढण्यात आले. बॉटल, प्लास्टिक पिशव्या आदिंसह वस्तू उचलण्यात आल्या. तसेच, सुके गवत एक जागी नेऊन जाळण्यात आले. तद्नंतर सर्व शिवप्रेमींनी राजे शिवछत्रपती महाराजांना मानवंदना देण्यात आली.

### संवर्धन, जतनाअभावी किल्ल्याची दैन्यावस्था

३५० वर्षापुर्वी उन्मत्त झालेल्या सिद्दीला नामोहरम करण्यासाठी छत्रपती शिवराय व शंभुराजे आणि जिगरबाज मावळ्यांनी मुरुड समुद्रकिनारापासून तीन किलोमीटर अंतरावर अरबी समुद्रात राजे शिवछत्रपती महाराजांनी पद्मदुर्ग किल्लाची निर्मिती केली. तद्नंतर सरकारने हा किल्ला ताब्यात घेऊन पुरातत्व विभागाकडे संवर्धन व जतन देण्यात आला. परंतु अजुनपर्यंत कोणात्याही सरकाराने या किल्ल्याचे संवर्धन व जतनही केले नाही. यामुळे किल्ल्याची दैन्यावस्था झाली.

## निवडक




### एड्स दिनानिमित्त विविध उपक्रम

**रसायनी :** रिलायन्स लोधीवली येथे जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून जनजागृती व आरोग्यविषयक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रसायनी परिसरात ट्रक ड्रायव्हर आणि कामगारांत गेटसमोर पथनाटय सादर करण्यात आले. तसेच पार्किंग परिसरात स्वेच्छेने एचआयव्ही तपासणी, डोळ्याची तपासणी शिबीर आणि आरोग्य विषयक विषयावर प्रश्न मंजुषा घेण्यात आली. योग्य उत्तरे देणाऱ्यास बक्षीस देण्यात आले. रिलायन्स केंद्रात हाडांची खनिज घनता तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. ऑटिओपेनिया व ऑस्टिओपोरेसेस असलेल्या रुग्णांना आवश्यक औषधे देण्यात आली. मुलांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. पोषण आहार योजनेचे मुख्य उद्दीष्ट कुपोषणाची जोखीम कमी करणे, उपचार कालावधीतील सहनशक्ती वाढवणे, रुग्णांचा बरा होण्याचा वेग बाढवणे व आरोग्यदायी समाजनिमित्त मदत करणे. रिलायन्स या प्रकल्पा अंतर्गत सुमारे ५० क्षयरुग्णांना रिलायन्स कडून उपचार काळात प्रोटीनयुक्त आहार कीट आणि आहार मार्गदर्शन देण्यात येणार आहे.



### डॉ. महेश निमणे पुरस्काराने सन्मानित

**पाताळगंगा :** नुकताच पाल्मिस्ट दिल्ली या नामांकित संस्थेतून पीएचडी पदवीने सन्मानित केलेले डॉ. महेश निमणे यांना पुणे येथे टॅलेंट कट्टा महाराष्ट्र राज्य आयोजित सह्याद्रिरत्न या पुरस्काराने पत्रकार भवन, नवीपेठ पुणे येथे सन्मानित करण्यात आले. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, श्रीफळ अशा या पुरस्काराचे स्वरूप होते. गेले अनेक वर्ष खोपोली येथे सुखी वास्तू स्पिरिचुअल सर्व्हिसेसच्या माध्यमातून अनेकांना मार्गदर्शन करीत असून या वास्तू शास्त्राचा हजारो व्यक्तींना उत्तम लाभही झाला. गुढ विज्ञान या क्षेत्रात वास्तुशास्त्र, अंकशास्त्र, रेकी, लोलक शास्त्र यात प्राविण्य मिळवलेले व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जात आहे. आजवर निमणे यांना खोपोली पद्मश्री पुरस्कार, पुणे उद्योग भूषण, टाइकून्स ऑफ़ महाराष्ट्र, नाशिक, वास्तु श्री पुरस्कार, संभाजी नगर, प्रो पाल्मिस्ट दिल्ली, विद्यास्पति, वृंदावन उत्तर प्रदेश आदि पुरस्कार प्रदान करण्यात आले आहे. तसेच त्यांनी केलेले मार्गदर्शन अनेकांसाठी लाभदायक ठरले आहे.

### कंत्राटी डॉक्टरांपुढे आर्थिक संकट

**रत्नागिरी :** एमबीबीएस डॉक्टर उपलब्ध होत नसताना रत्नागिरी जिह्यातील कोलमडलेली आरोग्य यंत्रणा कंत्राटी बीएएमएस डॉक्टर सांभाळत आहेत. मात्र जिह्यातील १०२ कंत्राटी डॉक्टरांचे आर्थिक आरोग्य सरकारने बिघडवले आहे. हे बीएएमएस डॉक्टर २४ तास सेवा देत आहेत. मात्र त्याची अवस्था बिनपगारी फुल अधिकारी अशी झाली



आहे. कारण कंत्राटी डॉक्टरांना गेले पाच महिने पगार मिळालेला नाही. जिल्ह्यात ६७ प्राथमिक आरोग्य केंद्र व २ उपजिल्हा रुग्णालय आहेत. एमबीबीएस डॉक्टर ग्रामीण भागात येऊन सेवा देण्याकडे पाठ फिरवत असल्याने एमबीबीएस डॉक्टरांची अनेक पदे रिक्त आहेत. रिक्त पदांमुळे ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणाच ‘व्हेंटिलेटर’वर गेली होती. त्यानंतर बीएएमएस डॉक्टरांना पंत्राटी पद्धतीने नेमण्यात आले. एकूण १०२ डॉक्टरांची पंत्राटी पद्धतीने नेमणूक करून कोसळणारी आरोग्य यंत्रणा सावरण्यात आली. कंत्राटी डॉक्टर प्रति महिना ४० हजार वेतनावर काम करू लागल्यानंतर एकदाही त्यांना वेळेवर पगार सरकारने दिलेला नाही.

### बिबट्याने केली चार वासरांची शिकार

**मंडणगड :** मंडणगड तालुक्यातील पालवणे परिसरात बिबट्याने मागील दोन दिवसांत चार वासरांचा फडशा पाडला आहे. त्यामुळे पालवणे विभागातील जनता भितीच्या छायेखाली वावरत असून वनविभागाने तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत



आहे. पालवणे धनगरवाडी येथील गरीब शेतकरी महेश हिरवे व नामदेव हिरवे यांची एकूण ४ वासरे बिबट्याने मारली. त्यामुळे पालवणे परिसरात सर्व शेतकरी भयभीत झाले आहेत. दुग्ध व्यवसाय करून येथील शेतकरी बांधव आपला उदरनिर्वाह चालवत आहेत. परंतु, बिबट्यांचा वावर पालवणे परिसरात दिवसेंदिवस वाढत असून गरिब शेतकऱ्यांचा दुग्धव्यवसाय धोक्यात आला आहे. वनविभागाने पालवणे परिसरातून बिबट्यांना पकडून अन्य ठिकाणी पाठवून हा परिसर बिबटेमुक्त करून येथील गरीब शेतकरी बांधवांना न्याय देऊन सहकार्य करावे, अशी स्थानिक नागरीकांची मागणी आहे. तसेच, लवकरच वनविभागाने बिबट्यांचा कायमचा बंदोबस्त न केल्यास महाराणी अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंचतर्फे उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामचंद्र आखाडे यांनी दिला आहे.


### विनामूल्य करिअर मार्गदर्शन शिबीर

**पाली :** दहावी आणि बारावी या दोन वर्षानंतर विद्यार्थ्यांच्या आयुष्याला महत्वपूर्ण वळण मिळत असते. मात्र दहावी, बारावीनंतर नेमके कोणते शिक्षण घ्यावे? कोणते कोर्स करावे? याबाबत विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची माहिती नसते. त्यामुळे आपला कल, आवड, बुद्धिमत्ता, क्षमता यांचा विचार न करता विद्यार्थी चुकीच्या क्षेत्राची निवड करण्याची शक्यता असते. त्यामुळे त्यांचे कायमस्वरूपी नुकसान होऊ शकते. हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि करियर यशस्वी व्हावे, यासाठी त्यांना शिक्षण, करिअरची निवड करण्या अगोदरच योग्य ती माहिती व्हावी. त्यांचे शिक्षण यशस्वीपणे पूर्ण व्हावे आणि करिअर योग्य पद्धतीने निवडावे, यासाठी सुधागड तालुका मराठा समाजाच्या वतीने स्वर्गीय सटुराम सखाराम साजेकर सभागृह, मराठा समाज भवन, पाली, तालुका सुधागड येथे रविवार दि.२१ डिसेंबर रोजी दुपारी १.३० वा. ‘विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याचा राजमार्ग’ हे विनामूल्य करिअर मार्गदर्शन शिबीर आयोजित केले आहे. या शिबिरात प्रसिद्ध लेखक, सजग नागरिक मंचचे अध्यक्ष, करिअर मार्गदर्शक व्याख्याते माननीय विवेक वेलणकर मार्गदर्शन करणार आहेत.

## निवडक

### बिबट्यांच्या संवर्धनासाठी जनजागृतीचा उपक्रम

**पनवेल :** सध्या महाराष्ट्रात अनेक भागांत बिबट्यांचा वावर



मोठ्या प्रमाणावर वाढलेला दिसून येत आहे. काही ठिकाणी मानवी वस्तीजवळ बिबट्यांचे आगमन होऊन हल्ल्यांच्या घटनाही घडत आहेत. मात्र हे हल्ले बिबट्यांच्या आक्रमकतेमुळे नसून मानवी अतिक्रमणामुळे त्यांच्या नैसर्गिक अधिवासावर होणाऱ्या परिणामाचे द्योतक आहेत. याच पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छता अभियानाअंतर्गत जनजागृतीसाठी भिंती रंगविण्याचे काम सुरू आहे. पनवेल येथील एका पुलावर सेव्ह मी तुम्ही माझ्या जंगलात आलात, मी नाही, आम्हालाही निसर्गाच्या सान्निध्यात वावरू द्या असे भावनिक संदेश असलेले भित्तीचित्र साकारण्यात आले आहे. या उपक्रमातून नागरिकांमध्ये वन्यजीव संवर्धनाबाबत जागृती निर्माण करून मानव व वन्यजीव यांच्यातील संघर्ष कमी करण्याचा संदेश देण्यात येत आहे. निसर्गाचे रक्षण म्हणजेच आपल्या भविष्यासाठीची जबाबदारी असल्याचे या भित्तीचित्रातून प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले आहे.




### विस्टा फूडतर्फे वाघिवली शाळेला संगणक

**नवीन पनवेल :** विस्टा फूड लिमिटेड तळोजा एमआयडीसी यांनी आजपर्यंत शिक्षणासाठी मोठे योगदान दिले असून त्यांनी नुकतेच रायगड जिल्हा परिषदेच्या वाघिवली मराठी विद्यामंदिरास दोन संगणक भेट दिले आहेत. यावेळी बोलताना माधव पाटील यांनी कंपनीचे सल्लागर चंद्रशेखर सोमण व एमडी भुपिंदर सिंग यांचे कौतुक केले. ते म्हणाले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या १ किमीच्या अंतरावर असलेल्या परंतु सुखसोयीपासून उपेक्षित असलेल्या वाघिवली शाळेला संगणक देऊन समाजात एक वेगळा संदेश दिला आहे. यापूर्वी समुद्राचा वेढा असलेल्या या गावात आपण सार्वजनिक काम केल्याची आठवण करुन दिली. यावेळी जीएम-प्लांट हेड प्रवीण ठाकूर, डीजीएम-ॲडमिन इंद्रायनी आगलावे, प्लांट मॅनेजर निलेश म्हात्रे, असिस्टंट मॅनेजर प्रथमेश पाटील, आयटी विभागाचे अजित मिश्रा यांच्यासह सरपंच अनिल पाटील, समितीचे सदस्य गणेश पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते.



### माणगांव उपजिल्हा रुग्णालय लेन्स भेट

**माणगांव :** रोटरी क्लब ऑफ मुंबई सेंट्रलच्या सहकार्याने क्लब आशिष मेहता, राजेश शहा, दिव्या बर्मेच्या दत्ताराम शिंदे यांच्या माध्यमातून माणगांव उपजिल्हा रुग्णालयाकरिता (दि.१३) डिसेंबर रोजी डोळ्यांच्या ऑपरेशनसाठी २०० लेन्स भेट देण्यात आले. यावेळी रोटरी क्लब मुंबई सेंट्रल संचालक दत्ताराम शिंदे, डॉ. शंतनु डोईफोडे, डॉ मेहता, डॉ देशमुख, संतोष खाडे, नंदकुमार मेहता, जयंत मेहता , सुजित लाखाडे आदी रुग्णालय कर्मचारी उपस्थित होते. ग्रामीण भागात शैक्षणिक व सरकारी रुग्णालयात आवश्यक असणारी साधन व्यवस्था ही त्यांच्या कडून होत असते. या संस्थेच्या माध्यमातून तालुक्यातील सर्वसामान्य लोकांसाठी, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम क्लबच्या माध्यमातून राबवले जात आहेत.




### दिव्यांगांना व्यवसायोपयोगी साहित्याचे वाटप

**उरण :** दिव्यांगांना केवळ सहानुभूती न देता स्वावलंबनाची संधी देणे ही काळाची गरज आहे. स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी आवश्यक साधने व सक्षम पाठबळ मिळाल्यास दिव्यांग व्यक्ती सन्मानाने उपजीविका करू शकतात आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात आत्मविश्वासाने सहभागी होऊ शकतात. अशा उद्योजकतेला चालना देणारे उपक्रम सामाजिक समतेचा पाया अधिक भक्कम करतात. दिव्यांग व्यक्तींना व्यवसायाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर - जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणांचे आभार दिव्यांग बांधवांनी व्यक्त केले. कार्यक्रमास रविष कुमार सिंग, मनिषा जाधव, विनय मल्ल, रवींद्र पाटील, विजय ओझाला, मदन पाटील, ज्ञानेश्वर भोईर, प्रतीक्षा फर्डे, दिव्यांग सामाजिक संघटना उरणचे सर्व शिलेदार, तसेच उरण तालुक्यातील लाभार्थी दिव्यांग बांधव व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- HP गॅस हाशिवरे इथे कामासाठी मुलगा पाहिजे शिक्षण बी.कॉम ग्रॅज्युएट (इंग्रजी मिडीयम) काम अकाऊन्टंट २ वर्षी अनुभव असल्यास प्राधान्य संपर्क : ९७०२६७४५५५
- घरकामासाठी बाई पाहिजे अर्धवेळ साठी,स्थळ-पंतनगर, संपर्क क्र-८०९७२०५९३९/९४२२३७५१२४
- हातगाडी विकणे आहे. संपर्क : नम्रता -७७४४०९८५५४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## सैनिक विश्रांतीगृह मोजतोय
# अखेरची घटका
### निधीअभावी इमारतीला भूतबंगल्याची अवकळा

**| माणगाव | प्रतिनिधी |**

स्वातंत्र्योत्तर काळातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या माणगाव शहराच्या मध्यवर्ती भागात, कचेरी रोडलगत विद्यानगरच्या प्रवेशद्वाराजवळ वसलेले सैनिक विश्रांतीगृह आज शासनाच्या आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अक्षरशः अखेरची घटका मोजत आहे. एकेकाळी गजबजलेले, शिस्तीचे आणि राष्ट्रसेवेचे प्रतीक ठरलेले हे विश्रामगृह आज मात्र निधी अभावी जीर्णावस्थेत पोहोचले असून त्याला जणू भूतबंगल्याची अवकळा प्राप्त झाली आहे.




### अन्यथा इतिहासाची नोंद केवळ पानांत

देशसेवेचे प्रतीक असलेल्या या वास्तूचे जतन आणि पुनरुज्जीवन होणे, ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून समाजाचीही नैतिक जबाबदारी आहे. अन्यथा इतिहासाच्या पानांत केवळ नोंद राहील की, एकेकाळी सैनिकांच्या सन्मानासाठी उभारलेले विश्रांती गृह प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे काळाच्या पडद्याआड गेले.

गेली अनेक वर्षे या विश्रामगृहाची किमान डागडुजी तरी करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक माजी सैनिक, नागरिक सातत्याने केली जात आहे. मात्र या मागण्यांकडे शासन आणि संबंधित विभागांकडून ठोस दखल घेतली गेलेली नाही. सैनिक कल्याण विभाग आणि इतर प्रशासकीय यंत्रणांमधील कागदोपत्री नियम, कायदे आणि विभागीय अडथळ्यांमध्ये हा निधी अडकून पडला असून त्याची झळ थेट या ऐतिहासिक इमारतीला सहन करावी लागत आहे. सुमारे पाच वर्षांपूर्वी केवळ संरक्षण भिंती उभारण्यात आल्या. मात्र मुळ सैनिक विश्रांती गृहाच्या नूतनीकरणाचा प्रश्न तसाच प्रलंबित राहिला. आज या इमारतीच्या परिसरात झाडे झुडपे असून, भिंतींमधील दगड-वीटा ढासळू लागल्या आहेत. खिडक्या-दरवाजे मोडकळीस आले असून छताची आणि भिंतींची अवस्था धोकादायक बनली आहे. कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकेकाळी या गृहात सैनिक व पोलीस भरतीसाठी तरुणांची प्रचंड गर्दी होत. विविध सामाजिक आणि प्रशासकीय सभा- बैठका येथे पार पडत. माजी सैनिक विश्रांतीसाठी येथे मुक्काम करत असत. ज्या सैनिकांनी देशासाठी आपल्या प्राघणांची पर्वा न करता लढा दिला, काही शहिद झालेत, काहींनी स्वातंत्र्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले, त्याच सैनिकांच्या सन्मानार्थ उभारलेली ही इमारत आज प्रशासनाच्या उदासीनतेमुळे अखेरची घटका मोजत आहे.

दरवर्षी ९ जानेवारी रोजी देशातील पहिले व्हिक्टोरिया क्रॉसपदक विजेते वीर यशवंतराव घाडगे यांच्या जयंतीनिमित्त विविध लोकप्रतिनिधी आणि अधिकारी येथे भेट देतात. भाषणे होतात, आश्वासने दिली जातात. मात्र त्या आश्वासनांची पूर्तता होत नाही. कार्यक्रम संपतो, फलक काढले जातात आणि पुन्हा या विश्रामगृहाच्या वाट्याला येते ते केवळ अंधार, दुर्लक्ष आणि शांतता. ना चिरा ना पणती अशी अवस्था आज या ऐतिहासिक सैनिक विश्रांती गृहाची झाली आहे.

## उरणच्या आनंदनगरात अंधार



**| उरण | प्रतिनिधी |**

उरण नगरपालिका हद्दीतील आनंदनगर परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून अंधाराचे साम्राज्य पसरले असून नागरिकांना जीव मुठीत घेऊन ये-जा करावी लागत आहे. रात्रीच्या वेळी रस्त्यावरील पथदिवे बंद अवस्थेत असल्याने परिसर पूर्णतः अंधारात बुडाल्याचे चित्र आहे.

आनंदनगर हा उरणमधील वर्दळीचा परिसर आहे. दिवसरात्र वाहनांची गर्दी, रस्त्यावर गॅरेजवाल्यांचे बस्तान, टपरी चालकांची मक्तेदारी याचा त्रास येथील नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यातच पाणीटंचाई, नाल्यांची वेळेवर साफसफाई न होणे, मच्छरांचा वाढता प्रादुर्भाव आणि औषध फवारणीचा अभाव यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

### मूलभूत सुविधा पुरवण्याची मागणी

रात्रीच्या वेळी रस्त्यावरील पथदिवे बंद असल्याने अपघात, चोरी व अनुचित प्रकारांची भीती नागरिक व्यक्त करीत आहेत. या गंभीर बाबींबाबत स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा नगरसेवक व संबंधित अधिकारी वर्गाच्या निदर्शनास समस्या आणून दिल्या. मात्र वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून साफ दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. आनंदनगरमधील नागरी सुविधांकडे तातडीने लक्ष देऊन रस्त्यावरील पथदिवे त्वरित सुरू करावेत, तसेच मूलभूत सुविधा पुरवाव्यात, अशी जोरदार मागणी आता स्थानिक ग्रामस्थांकडून होत आहे. अन्यथा आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल, असा इशाराही नागरिक देत आहेत.

## पी.एन.पी महाविद्यालयाकडून
# एड्स जनजागृती रॅलीला प्रतिसाद




**| अलिबाग | प्रतिनिधी |**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि अजीवन विस्तार विभाग यांच्या वतीने शनिवार (दि.१३) रोजी जागतिक एड्स पंधरवडा निमित्त एड्स जनजागृती रॅली काढण्यात आली होती.

रॅलीची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांच्या मार्गदर्शनाने झाली. या रॅलीसाठी प्रमुख मार्गदर्शक अमित सोनवणे, कल्पना गाडे यांनी रॅलीमध्ये महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. पीएनपी वरिष्ठ महाविद्यालय ते गोंधळपाडा या रॅलीमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन एड्स बद्दल लोकांच्या मनामध्ये जनजागृती केली, तसेच अलिबाग रुग्णालयातील एड्स विभागाकडून देण्यात येणाऱ्या पुस्तिकांचे वाटप घरोघरी करण्यात आले. रॅलीमध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, संचालक विक्रांत वार्डे, कार्यालयीन मार्गदर्शक गबाजी गीते यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रा. मिलिंद घाडगे, प्रा. कैलास सिंह राजपूत, प्रा. संपदा शिंदे, अजीवन विस्तार विभागाच्या प्रा. वृषाली घरत, इतिहास विभागाचे प्रा. साईनाथ पाटील तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वेदक कॉलेजच्या
# एनएसएस शिबिराची सांगता



**| तळे | प्रतिनिधी |**

श्री गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठान संचलित जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत मौजे चरई बुद्रुक येथे ८ ते १४ डिसेंबर २०२५ या कालावधीत सात दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा समारोप सोहळा रविवार (दि.१४) डिसेंबर रोजी उत्साहात पार पडला. या सात दिवसाच्या कालावधीमध्ये ॲड. परेश जाधव, किशोर शिताळे, सिद्धेश रघुवीर, उज्ज्वल बगाडे, डॉ श्रीकृष्ण तुपारे, ऋतुजा रायकर यांनी विविध विषयावर विद्यार्थाना मार्गदर्शन केले. या दरम्यान विद्यार्थ्यांनी चरई बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळेची स्वच्छता केली. तसेच मंदिर परिसर व पाणवठ्यांची स्वच्छता करणे, सामाजिक जनजागृतीचे विविध उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमास पुरुषोत्तम मुळे, महादेव काप, मनोहर काप, अनिल काप, तांदळेकर, सूचित पतारे, ॲड उत्तम जाधव, नामदेव काप, यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## अपुऱ्या साधनांमुळे वनविभाग हतबल

**चिरनेर :** रायगड आणि ठाणे जिल्ह्याच्या वनविभागात वन्य प्राण्यांच्या संरक्षणासाठी आवश्यक साधनसामग्री व कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे येथे गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे वन्य प्राण्यांचे हल्ले रोखण्यासाठी वनविभाग्याचे कर्मचारी अधिकारी पुरते हतबल झाले आहेत. अपुरे प्रशिक्षण मिळालेला कर्मचारी वर्ग, मंकी कॅचर न मिळाल्यामुळे वनविभागाच्या कामावर परिणाम होतो. ज्यामुळे सुरक्षा आणि संरक्षण अधिक कठीण झाले आहे. वनमंत्रालयाकडून या समस्या दुर्लक्षित केल्याने वनविभागात असंतोष वाढला आहे. पुरेसे पिंजरे नाहीत. भूल देण्यासाठी पुरेशा डॉक्टर्स, गन्स, औषधांची कमतरता आहे. बिबट्या मंकी कॅचर्स पुरेसे नाहीत. त्यामुळे वनविभागाला कठीण परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे.

## शेतकरी गटाने बांधला वनराई बंधारा



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुका कृषी विभागामार्फत तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या अक्कादेवी धरणाला जोडणाऱ्या ओढ्यावर शनिवारी (दि.१३) श्री महागणपती सेंद्रिय गटातील शेतकऱ्यांच्या श्रमदानातून वनराई बंधारा बांधण्यात आला आहे. सध्या कृषी विभागामार्फ वनराई बंधारे बांधण्याची मोहीम सुरू झाली असून, तालुक्यात ठिकाणच्या ओढ्यांवर वनराई बंधारे बांधण्यात येणार असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर, सुषमा गायकवाड यांनी दिली. यावेळी प्रफुल्ल खारपाटील, संजय पाटील, भास्कर ठाकूर, बाळकृष्ण मोकल, जगन ठाकूर, जगदीश ठाकुर, दामोदर मुंबईकर, बाळकृष्ण ठाकूर, समाधान म्हात्रे, रवींद्र ठाकूर, समाधान पाटील, मंगेश ठाकूर, रघुनाथ ठाकूर, बळीराम फोफेरकर, रमेश म्हात्रे चंद्रकांत म्हात्रे, अविनाश पाटील, कृष्णा म्हात्रे, गजानन म्हात्रे, प्रमोद मोकल, हिराजी ठाकूर आदींनी बंधारा उभारण्यास सहकार्य केले.

# पेणमध्ये स्थलांतरीत विद्यार्थ्यांचा सर्व्हे सुरू

**| पेण | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण २१४ शाळा असून या पैकी डोंगर पटयातील विद्यार्थी दरवर्षी नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये आपल्या पालकांबरोबर स्थलांतरीत होत असतात. कारण डोंगराळ भागात पावसाळयानंतर उदरनिर्वाहाची सोय होणे कठीण असते, त्यामुळे आदिवासी बांधव आपल्या कुटुंबसह शहराच्या आजुबाजुला रोजगाराच्या शोधात राहतात. त्यामुळे त्यांच्या सोबत कळत-नकळत त्यांची मुल देखील स्थलांतरीत होत असतात. पेण शहराच्या बाजुला मोतीराम तलाव, वडगाव, वाशी नाका, अंतोरा, पाटणोली, तसेच गडब या ठिकाणी मोठया प्रमाणात स्थलांतरीत झालेले कुटुंब वास्तव्याला आहेत. या आदिवासी विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून, पेण पंचायत



समिती शिक्षण विभागाकडून सर्व्हे सुरू झाला असून, या सर्व्हे दरम्यान स्थलांतरीत विद्यार्थ्यांचा शोध घेउन त्यांना हमीपत्र देऊन ज्या ठिकाणी स्थलांतरीत होउन वास्तव्य करत आहेत. त्याच्या जवळील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये या आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात आहे. पेणमध्ये पाचगणी, असाणी, चांदेपट्टी, बांगरवाडी, जिर्णे, पाबळ, या विभागातून साधारणतः ६० ते ७० विद्यार्थी स्थलांतरीत झाले आहेत. यांचा सर्व्हे करून अंतोरा पाटणेश्वर येथील विद्यार्थी अंतोरा शाळेत, वाशी नाक्यावरील विद्यार्थी उंबर्डे शाळेत, वडगाव येथील विद्यार्थी वडगाव शाळेत तर मोतीम तळयाजवळील विद्यार्थी नगरपालिकेच्या ८ नंबर शाळेत दाखल होत आहेत. पेण तालुक्यात या स्थलांतरीत विद्यार्थ्यांचा सर्व्हे मोठया प्रमाणात सुरू असून, या विद्यार्थीचे नुकसान होऊ नये म्हणून गटशिक्षण अधिकारी शर्मिला शेंडे या स्वतः स्थलांतरीत विद्यार्थ्यांच्या सर्व्हे वर लक्ष ठेउन आहेत. आमच्या प्रतिनिधींशी बोलताना शर्मिला शेंडे यांनी सांगितले की, कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून, पेण शिक्षण विभागाकडून केंद्र प्रमुखांना सर्व्हे चे आदेश दिले असून, या सर्व्हेमधील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय ते स्थायिक आहेत त्याच्या जवळील शाळांमध्ये केली आहे.

## भाई कोतवाल- हिराजी पाटील यांचे बलिदान | क्रांतीज्योती प्रज्वलित करून हुतात्म्याचे स्मरण
# अभिवादनासाठी नेरळमध्ये देशप्रेमींची गर्दी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ जवळील कोतवाल वाडी येथे हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांचा ८३ वा बलिदान दिन मराठी महिना तिथीप्रमाणे क्रांतीज्योती पेटवून साजरा झाला. भल्या पहाटे सहा वाजून दहा मिनिटांनी दोन्ही हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी देशप्रेमी नागरिकांची मोठी गर्दी होती. यावेळी विद्यार्थ्यांनी समूहगीत सादर केली तसेच क्रांतिकारकांचे स्मरण करणारी भाषणे केली. राष्ट्रपती पुरस्कार विजेते पोलीस अधिकारी सुभाष दगडखैर यांचे हस्ते क्रांतीज्योती प्रज्वलित करण्यात आली. त्याचेवेळी अवसरे येथे स्वातंत्र्यसैनिक भगत मास्तर स्मारक येथे क्रांतीज्योती प्रज्वलित करून हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले.



### अभिवादनसाठी दिंड्या

अवसरे येथे हरीनाम यज्ञ सोहळ्यात क्रांतिकारक भगत मास्तर प्रतिष्ठानकडून हुतात्म्यांचे पुण्यस्मरण सोहळ्याचे आयोजन केले. क्रांतिकारकांना अभिवादन करण्यासाठी मुरबाड तालुक्यातील जांबुर्डे आणि कर्जत तालुक्यातील चई येथील वारकऱ्यांनी पायी दिंडीने येत अभिवादन केले. मार्गशीष वद्य एकादशी रोजी हौतात्म्य प्राप्त झाले होते. त्याच्यासोबत क्रांती लढ्यातील स्वातंत्र्यसैनिक भगत मास्तरांना देखील मार्गशीष एकादशी रोजी मृत्यू आला होता. त्यामुळे यांचा पुण्यस्मरणासाठी कर्जत तालुक्यातील अवसरे येथे तिथी प्रमाणे अभिवादन कार्यक्रम आणि अखंड हरिनाम सोहळा आयोजित करून साजरा केला जातो.

माथेरान येथील क्रांतिकारक भाई कोतवाल आणि मानिवली येथील क्रांतिकारक हिराजी गोमाजी पाटील यांना २ जानेवारी १९४३ रोजी सकाळी सहा वाजून १० मिनिटांनी ब्रिटिशांच्या गोळ्यांनी हौतात्म्य प्राप्त झाले. या दोन्ही क्रांतिकारक यांना देशासाठी लढताना मुरबाड तालुक्यातील सिद्धगड येथे हुताम्य २ जानेवारी १९४३ झाले होते. तर मराठी महिना नुसार मार्गशीष वद्य एकादशी हा दिवस असल्याने या दिवशी नेरळ जवळील कोतवाल वाडी येथे स्वातंत्र्यसैनिक हरिभाऊ भडसावळे यांनी उभारलेल्या कोतवालवाडी ट्रस्टमध्ये तिथीप्रमाणे या दोन्ही हुतात्म्यांचा बलिदान दिन साजरा केला जातो.

सकाळी सहा वाजून दहा मिनिटांनी राष्ट्रपती पुरस्कार विजेते पोलीस अधिकारी सुभाष दगडखैर यांचे हस्ते क्रांतीज्योत प्रज्वलित करण्यात आली. त्यावेळी कोतवाल वाडी ट्रस्टचे अध्यक्षा संध्या देवस्थळे, माजी अध्यक्ष अनसूया पादीर, तसेच विश्वस्त रामचंद्र ब्रह्मांडे, सावळाराम जाधव, शेखर भडसावळे, बाळकृष्ण पादीर उपस्थित होते.

तसेच विद्या विकास शाळेच्या विद्यार्थ्यांनी क्रांतिकारकांच्या जीवनाचा आढावा घेणारे भाषणे केली. यावेळी नेरळ ग्रामपंचायत माजी उप सरपंच बल्लाळ जोशी,माजी सदस्य राजन लोभी, नेरळ विद्या विकास शाळेच्या मुख्याध्यापिका विनया काकडे, यांच्यासह अनेक देशप्रेमी नागरिक उपस्थित होते. हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांचा स्मुती दिन अवसरे येथील स्वातंत्र्यसैनिक भगत मास्तर स्मारक येथे देखील तिथीप्रमाणे सकाळी सहा वाजून दहा मिनिटांनी क्रांतीज्योत पेटवून साजरा झाला.

## जाहिर नोटीस

आमचे अशिल सुनिता विश्वनाथ नागवेकर, विनय विश्वनाथ नागवेकर, विकास विश्वनाथ नागवेकर, उमेश विश्वनाथ नागवेकर, विनंती वंदेश साखरकर (पुर्वाश्रमीची सुमन विश्वनाथ नागवेकर), नेहा निलेश शिलदनकर (पुर्वाश्रमीची शुभ्रता विश्वनाथ नागवेकर), तसेच दर्शना दत्तात्रेय नागवेकर, शिल्पा सुबोध पाटील (पुर्वाश्रमीची शिल्पा दत्तात्रेय नागवेकर) यांचे सांगणेवरुन तमाम जनतेस कळविण्यात येते की,

आमचे अशिलांची नणंद व आत्या श्रीमती उषा गोपाळ चव्हाण या दिनांक १६/१०/२०२३ रोजी अविवाहीत मयत झाल्या असून त्यांचे नावे मौजे आवास, ता. अलिबाग येथे भुमापन क्रमांक व उपविभाग ७२४/२, क्षेत्र ४.६०.०० चौ.मी. यापैकी १.५०.०० चौ.मी., आकार १५.०० रु.पै. ही बिनशेती मिळकत आहे. तसेच सदर बिनशेती जमिन मिळकतीमध्ये घर मिळकत क्रमांक १७६ ब, क्षेत्र ६५.४९ चौ.मी. ही घर मिळकत आहे.

कै. उषा गोपाळ चव्हाण या अविवाहीत मयत असल्याने त्यांना त्यांच्या पश्चात आमच्या अशिलांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही नातेवाईक नाहीत. त्यामुळे उपरोक्त दोन्ही मिळकतींच्या हक्कनोंदपत्रकी आमच्या अशिलांची नांवे लावण्यासाठी आमचे अशिल योग्य ती कायदेशीर कार्यवाही सुरु करीत आहेत.

तरी उपरोक्त मिळकतींच्या हक्कनोंदपत्रकी आमच्या अशिलांची नांवे लावण्यासाठी अन्य कोणाची हरकत असल्यास त्यांनी पंधरा दिवसात त्यांच्या हरकती लेखी स्वरुपात आमच्याकडे सादर कराव्यात. पंधरा दिवसात कोणाच्या हरकती आल्या नाहीत तर आमच्या अशिलांची नांवे लावण्यासाठी कोणाची हरकत नाही असे गृहित धरुन आमचे अशिल कै. उषा गोपाळ चव्हाण यांच्या नांवे असलेल्या मिळकतींच्या हक्कनोंदपत्रकी आमच्या अशिलांची नांवे लावतील. तसेच पंधरा दिवसानंतर आलेल्या हरकतींचा कोणताही विचार केला जाणार नाही.

अलिबाग
दिनांक १५/१२/२०२५

**ॲड. गीता संतोष पवार**
कार्यालयाचा पत्ता-०५, श्रृती सारंग अपार्टमेंट,
युनियन बँकेसमोर, अलिबाग-रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की,

मिळकतींचे वर्णन :- गांव नांदगांव, ता. मुरुड, जि. रायगड गट क्रमांक व उपविभाग ५८७, एकुण क्षेत्र हे. आर. ०.५२.९०, आकारणी ९.६८ पैकी क्षेत्र हे. आर. ०.४२.९०, लागवड- नारळ बागायत ही मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक अजिज करीम घलटे, कादिर करीम घलटे, फैरोज करीम घलटे, महामुद करीम घलटे, जैबुन्नीसा बशीर सुभेदार, कसीरा शौकत घलटे, वसिम शौकत घलटे, सलमान शौकत घलटे, अजगरी युसुफ घलटे, मुनव्वर युसुफ घलटे, मंसुर युसुफ घलटे, मेहताब वसिम गोंडेकर, मुसरत नजीर कुर, मासुमा युसुफ घलटे, इनायत अ. कादीर घलटे, मुअज्जम अ. कादीर घलटे, मुजीब अ. कादीर घलटे यांचेकडून त्याचप्रमाणे गांव नांदगांव, ता. मुरुड, जि. रायगड गट क्रमांक व उपविभाग ५८८, एकुण क्षेत्र हे. आर. ०.३८.४०, आकारणी ८.९४ पैकी इरफान लाला घलटे व अनिस लाला घलटे यांचेकडून त्यांच्या सामाईक नांवे दाखल असलेले क्षेत्र हे. आर. ०.०५.००, आकारणी १.२३, लागवड - नारळ बागायत या वर्णनाची मिळकत अशा दोन्हीं मिळकती आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविलेले असुन तसे साठेखत देखील आमचे अशिलांनी विद्यमान मालकांसोबत केलेले आहे.

वरील दोन्हीं मिळकती निर्वेध असल्याचा निर्वाळा त्या मिळकतींचे विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी देखील या मिळकतींमध्ये इतर कोणाचेही वहिवाट, गहाण, दान, लिज, फरोक्त, भागिदार, बक्षिस, मृत्युपत्रांकीत, दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन चौदा दिवसांत लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकती निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागावुन येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड.एम.जे.तांबडकर**
बी.कॉम.एल.एल.एम.,
ॲडव्होकेट व नोटरी

लक्ष्मीखार मुरुड,
ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड
पिन नं. ४०२४०१.
दि. १६/१२/२०२५

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे सुतारपाडा, ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक धनंजय दिनकर प्रधान, मोहन दत्तात्रेय प्रधान, रश्मी सुनिल कुलकर्णी, वैशाली जयंत प्रधान, आदित्य जयंत प्रधान, तन्वी जयंत प्रधान, सर्व रा. सुतारपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यामध्ये झालेली आहेत. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| सुतारपाडा ता.अलिबाग, जि.रायगड | २४/९ | ०-१८-२० पो.ख. ०-१२-१० एकूण ०-३०-३० | ०-३१ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १६.१२.२०२५

**ॲड. मच्छिंद्र एस.म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक १) चंद्रभागा पुंडलिक शेळके, २) रामचंद्र पुंडलिक शेळके, ३) ज्ञानेश्वर पुंडलिक शेळके यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे - आर्डे, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर-पॉ | आकार रु-पै |
|---|---|---|---|
| ५९ | १/ब | ०-५४-०० पो.ख. ०-१६-०० | ०-३७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:-२, ''लक्ष्मी सदन'', जुने एस. टी. स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की खालील वर्णनाची जमीन मिळकत त्यामध्ये असलेले घरासह या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.दिलीप मधुकर मोगरे. व सौ.मीना विनायक ढापरे, रा.मु.पो.मुंबई व नागाव, ता.अलिबाग, जि. रायगड. यांचेकडुन कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिलांचा मानस आहे. याकरिता सदर मिळकत विकत घेणेबाबत माझे अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी तशी बोलणी केली आहेत व माझे अशील व त्यांचेमध्ये साठेकरार देखील स्वाक्षरीत झालेला आहे.

**- मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| नागाव | १३४० | २ | ०-०४-२ | ८.४० |
| नागाव | १५९३ | - | ०-०१-८ | ३.६० |

सदर मिळकती या बिनशेती असुन त्यामधे असलेले ग्रामपंचायत नागाव कडील १२८२ क्रमांकाचे घर क्षेत्र १७२.५८ चौ.मीटर

सदर मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व बोजारहित असुन या मिळकतीवरील आपली मालकी अबाधित आहे तसेच सदरची मिळकत ही आपले प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा श्री. दिलीप मधुकर मोगरे, व सौ. मीना विनायक ढापरे, यांचे सोबत माझे अशिल करत असलेल्या व्यवहारांस कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत आणुन द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व या प्रकारे मागाहून आलेली अशी कोणतीही कसलीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

हे सर्वांस कळविले.

अलिबाग
दिनांक : १६/१२/२०२५

Cjayant law office
करीता
**स्वाक्षरीत /-**
**ॲड.जयंत हरेश्वर चेऊलकर**

## जाहिर नोटीस

तमाम सर्व लोकांस या नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, आमचे अशीलांनी दाखविलेल्या कागदपत्रांवरुन ही जाहिर नोटीस प्रसिद्ध करतो की,

आमचे अशीलांनी सन १९९९ सालात शांताबाई बाबू पाटील (सध्या मयत) कै. सहदेव बाबू पाटील, कै. गणपत बाबू पाटील यांचे विरुद्ध खालील मिळकतींचे सरस-निरस वाटप करुन मिळणेबाबत दावा दाखल केला होता व आहे. सदरचे दाव्याचा निकाल दिनांक २८.४.२००४ रोजी आमचे अशीलांचे लाभात झाला आहे. सदरचे मा. न्यायालयाचे हुकूमाप्रमाणे सदरचे खालील मिळकतींमधील आमचे अशीलांचा असणारा हिस्सा आमचे अशीलांना मे. कोर्टाने दिला आहे. सदरचे प्रकरण नांवे लावण्याकरिता आमचे अशीलांनी मे. कोर्टात दरखास्त दाखल केली आहे. सदरचे मिळकतीचे वर्णन :-

मौजे नारंगी, ता. अलिबाग, जि. रायगड सर्व्हे नंबर ५१/३, ५२/०, ८४/०, ८५/अ, ३८/०, ३९/२३१, ५४/३, ६४/५ब, १५१/०, २२३/१, १२१/३, १४५/२३, ३९/० व ४२/१ तसेच चिंचवली ग्रामपंचायत हद्दीतील घर क्र. ९१ क व ७४६.

सदरच्या वरील वर्णनाच्या मिळकती आमचे अशीलांचे निम्म्या हिश्श्याच्या मालकीच्या आहेत. वरील मिळकती ह्या प्रतिवादी परस्पर विक्री करणेचे विचारात आहेत. सदरचे मिळकतीपैकी स.नं. ८४ ह्या मिळकतीमधील असणारा भाट म्हणून ओळखणारा हिस्सा हा कै. नारायण लक्ष्मण पाटील यांची सहा मुले अनुक्रमे जनार्दन, नामदेव, माणिक, धर्माजी, हिराजी व चिंतामण यांना दिलेली आहे. त्याप्रमाणे त्यांचे हयातीपासून तेथे त्यांची वाडी आहे. त्याचा उपभोग ते घेत होते व सध्या त्यांचे वारस घेत आहेत. सदरचे प्रवादी यांचे वारस दादागिरी करुन सदरची मिळकत विक्री करणेचे तयारीत आहेत.

सदरच्या मिळकतीस कोणीही तिऱ्हाईत व्यक्तीने सदरचे मिळकतीबाबत विक्री व्यवहार किंवा कोणत्याही प्रकारे हस्तांतर करुन घेऊ नये अशाप्रकारे केलेल्या व्यवहाराबाबत आमचे अशील व नारायण लक्ष्मण पाटील यांचे वारसांची सक्त हरकत राहील. असा विक्री व्यवहार आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही. त्याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
ॲड. सचिन पाटील.
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग.

## ग्रामपंचायत रांजणखार डावली

मु. रांजणखार डावली, पो. सारळ, तर अलिबाग, जि. रायगड मोबा नं. ७८८८०२५९२१

जावक क्रं. : ९८ दिनांक :- १०/१२/२०२५

ग्रामपंचायत रांजणखार डावली हद्दीत सन २०२२-२३/२०२३-२४/२०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता १५ वा वित्त आयोग योजनेअंतर्गत खालील कामासाठी इच्छुक ठेकेदार यांचेकडून लिफाफा पद्धतीने दरपत्रक / निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | | सन | निधीचे नाव | अंदाजित रक्कम | इसारा रक्कम | निविदा सादर अंतिम तारीख | निविदा सादर वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पाण्याच्या टाकीजवळ RO प्लांट बसविणे | बंधित | २०२३/२४ | १५ वा वित्त आयोग | २१५१०० | | | |
| २ | उपकेंद्राला साहित्य देणे | अबंधित | २०२३/२४ | १५ वा वित्त आयोग | ११७०० | | | |
| ३ | लू प्लांट ला शेड बांधणे | अबंधित | २०२३-२४ | १५ वा वित्त आयोग | ५०००० | | | |
| ४ | सार्वजनिक शौचालय दुरुस्ती व रंगरंगोटी व सुशोभीकरण करणे | बंधित | २०२४-२५ | १५ वा वित्त आयोग | ७५००० | | | |
| ५ | ग्रा.प. हद्दीत सिमेंटच्या कचराकुंड्या बांधणे | बंधित | २०२४-२५ | १५ वा वित्त आयोग | १५०००० | | | |
| ६ | उपकेंद्रात पिण्याच्या पाण्याची टाकी बसविणे | अबंधित | २०२४-२५ | १५ वा वित्त आयोग | ४०००० | | | |
| ७ | शाळेत पिण्याच्या पाण्याची टाकी बसविणे | अबंधित | २०२४-२५ | १५ वा वित्त आयोग | १०००० | | | |
| ८ | पारंपारिक पाण्याची टाकी दुरुस्त व स्वच्छ करणे. | अबंधित | २०२४-२५ | १५ वा वित्त आयोग | २५००० | | | |

**अटी व शर्ती :-**
१. वरील विकास कामांसाठी वेगवेगळा निविदा लिफाफा पद्धतीने सादर कराव्यात.
२. कोणतेही एक अथवा अनेक निविदा नाकारण्याचा अधिकार प्रशासक यांनी राखून ठेवला आहे.
३. निविदा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष अथवा पोस्टाने दिनांक १९-१२-२५ रोजी ठीक ११ वाजेपर्यंत प्राप्त होतील त्याच निविदा ग्राह्य धरण्यात येतील
४. सदर विकास कामासाठीचा निधी अंदाजपत्रकाप्रमाणे अदा करण्यात येईल
५. प्राप्त निविदा दिनांक १९-१२-२५ रोजी ठीक ४ वाजता ग्रामपंचायतीत प्रशासकांच्या हस्ते उघण्यात येईल

सही/-
**निशा वंदनकर**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत रांजणखार डावली**

सही/-
**प्रितेश सुर्यकांत पाटील**
**प्रशासक**
**ग्रामपंचायत रांजणखार डावली**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित मालक १. सौ. अश्विनी अशोक जंगम, २. श्री.चेतन अशोक जंगम, ३.सौ.चैताली अनिल जंगम, ४.सौ.नम्रता अशोक जंगम, यांच्या हिश्शातील मालकी हक्काची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकती असून, आमचे अशिल यांनी सदर मिळकत खरेदीखत करून विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतींचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे : -

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे गुंडगे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | भूधारणा पद्धती भोगवटादार वर्ग | क्षेत्रफळ हेक्टर आर | आकारणी रू. | आकारणी पै. |
|---|---|---|---|---|
| ६८/२ | १ | ०-१०-१० | १ | ३७ |
| | पोटखराबा | ०-०४-८० | | |
| | एकुण | ०-१४-९० | १ | ३७ |

प्राप्त परिस्थितीत वरील नमूद केलेल्या जमिन मिळकतींमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम. ओ. यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाने स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येथून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहाराने काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबदल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल यानी तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ॲड. सुशांत प्र. घरत**
बी. कॉम. एल. एल. बी.
**पत्ता :-** फ्लॅट नं. ४०१ व ४०२, चौथा मजला,
ओम साई बिल्डिंग, प्लॉट नं. १०१/३, गार्डन
हॉटेल जवळ, सायन पनवेल हायवेच्या बाजुला,
जुना ठाणा नाका, पनवेल, जिल्हा रायगड-४१०२०६
Cont. No. 9594993141

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे धोंडपाडा, ता.पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. प्रभाकर वासुदेव म्हात्रे यांनी त्याचे नमुद यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री. गोविंद हरी कडू यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| धोंडपाडा | १०८/५ | ०.२१.७० पो.ख ०.००.०० एकुण क्षेत्र ०.२१.७० | १.६२ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही/-
ठिकाण: पेण
दि.१६/१२/२०२५

**ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो. नं. ९८२२०३०३८९

दिनांक : १६/१२/२०२५

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक बारकू उर्फ चंद्रकांत लक्ष्मण शिंदे मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :**
**मौजे माणगाव खुर्द, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील**

| सर्वे नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| २०८ | ०-१८-०० | ०-०५ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण - पाली
दि. १६/१२/२०२५

सही /-
**ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
रा-जांभूळपाडा, तालुका सुधागड जिल्हा रायगड
मोबाईल नंबर - ९१६८८०१०४८

## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड - ४१० २०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
**दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स -०२२-२७४६७४४०**
**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र.४१**
**(ई-निविदा) सन २०२५-२६**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे ( दुरध्वनी क्र. ०२२- २७४५२७७८ फॅक्स ०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www. mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

**टिप-** या निविदेमध्ये एकूण ०५ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १६.१२.२०२५ सकाळी १०.०० ते दिनांक २३.१२.२०२५ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदाजा.क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक :-

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**पनवेल**

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे सुतारपाडा, ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक संदिप बाळाराम पाटील, संजय बाळाराम पाटील, शिल्पा रविंद्र नाईक, वैशाली हरिभाऊ घरत, सर्व रा. सुतारपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यामध्ये झालेली आहेत. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| सुतारपाडा ता.अलिबाग, जि.रायगड | २३/१ | ०-३०-९० पो.ख. ०-०१-५० एकूण ०-३२-४० | ७-३५ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १६.१२.२०२५

**ॲड. मच्छिंद्र एस.म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. संजय जनार्दन गांधी व सौ. शितल सतिश कोळवणकर यांचेकडून कायमस्वरूपी विकसित करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात नोंदणीकृत विकसन करारनामा झालेला आहे. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ०७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर बिनशेती जमिन मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र-(आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड | २६/१/२ | ४-७२-०० | ४७.२० |

अलिबाग,
दि. १५/१२/२०२५

**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
M.M. Legal and Associates
MAH/5773/2006
Rituraj Plaza, Flat No.1,
Ground Floor, Shivaji Chouk
Near Gawade Optics.
Alibag Raigad.

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे चौल, ता.अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक धरती निलेश राऊत, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | २३२८ | ०-६६-५० पो.ख.०-०२-५० एकुण क्षेत्र ०-६९-०० | ३९.५० |

वर नमुद मिळकतीपैकी धरती निलेश राऊत यांच्या नावे खाते क्र.४४९५ अन्वये असलेले क्षेत्र ०-०६-१० हे.आर., आकार ३.६२ रु. पैसे या जमिन मिळकतीबाबतचे

दिनांक : १५/१२/२०२५
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्युम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# भारत पहिल्यांदाच स्क्वॉश विश्वचषक विजेता

## हाँगकाँगला ३-० ने हरवून मिश्र सांघिक स्पर्धेत सुवर्ण; पंतप्रधानांनीही केले अभिनंदन

। चेन्नई । वृत्तसंस्था ।

चेन्नई येथील एक्सप्रेस एव्हेन्यू मॉलमध्ये खेळल्या गेलेल्या स्क्वॉश वर्ल्ड कपच्या अंतिम फेरीत भारतीय मिश्र संघाने हाँगकाँगला ३-० ने हरवून इतिहास रचला. मिश्र सांघिक स्पर्धेत भारताचे हे पहिले सुवर्णपदक आहे. यापूर्वी २०२३ मध्ये भारताची सर्वोत्तम कामगिरी कांस्यपदक होती.या स्पर्धेत १२ संघांनी शॉर्ट आणि फास्ट फॉरमॅटमध्ये भाग घेतला. भारताने उपांत्य फेरीत बलाढ्य मानल्या जाणाऱ्या इजिप्तच्या संघाला हरवून अंतिम फेरीत स्थान मिळवले होते. अंतिम सामन्यात भारतीय खेळाडूंचे वर्चस्व सुरुवातीपासून शेवटपर्यंत कायम राहिले.



भारतीय संघात जोशना चिनप्पा, अभय सिंह, वेलावन सेंथिलकुमार आणि अनाहत सिंह यांचा समावेश होता. सामना पाहण्यासाठी मोठ्या संख्येने प्रेक्षक एक्सप्रेस अव्हेन्यू मॉलमध्ये उपस्थित होते.भारताची जोशना चिनप्पा रविवारी चेन्नई येथे झालेल्या वर्ल्ड कप मिक्स्ड टीम फायनलमध्ये हाँगकाँगच्या का यी ली विरुद्ध खेळताना भारताने हा सामना जिंकून विजेतपद पटकावले.

पंतप्रधानांनी स्क्वॉश वर्ल्ड कप विजयाबद्दल भारतीय संघाचे अभिनंदन केले. त्यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिले की, एसडीएटी स्क्वॉश वर्ल्ड कप २०२५ मध्ये पहिल्यांदाच विजेतेपद पटकावून भारतीय संघाने इतिहास रचला आहे. त्यांनी जोशना चिनप्पा, अभय सिंग, वेलावन सेंथिल कुमार आणि अनाहत सिंग यांच्या कठोर परिश्रम, समर्पण आणि दृढनिश्चयाचे कौतुक केले आणि सांगितले की हा विजय देशातील तरुणांमध्ये स्क्वॉशची लोकप्रियता वाढवेल.

जोशना चिनप्पा म्हणाली, स्पर्धेपूर्वी आम्हा सर्वांना विश्वास होता की आम्ही हे करू शकतो. सर्व खेळाडू चांगल्या फॉर्ममध्ये होते.तिने घरच्या प्रेक्षकांच्या पाठिंब्यालाही विशेष म्हटले आणि सांगितले की तिने तिच्या कारकिर्दीत पहिल्यांदाच इतक्या मोठ्या आणि उत्साही प्रेक्षकांसरोर खेळले.स्क्वॅशचा २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये पहिल्यांदाच समावेश केला जात आहे. अशा परिस्थितीत, हा विजय युवा खेळाडू अनाहत सिंग आणि अभय सिंग यांच्यासह भारतीय स्क्वॅशसाठीही एक मोठी उपलब्धी मानली जात आहे.

### जोशना चिनप्पाने विजयाने सुरुवात केली

भारतीय संघाचे नेतृत्व अनुभवी खेळाडू जोशना चिनप्पाने केले. अंतिम फेरीतील पहिल्या सामन्यात जोशनाने हाँगकाँगच्या यी ली (वर्ल्ड नंबर-३७) ला ३-१ ने हरवून भारताला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर अभय सिंगने अ‍ॅलेक्स लाऊला ३-० ने पराभूत केले. निर्णायक सामन्यात १७ वर्षीय अनाहत सिंगने टोमॅटो हो ला ३-० ने हरवून भारताचा ऐतिहासिक विजय निश्चित केला.

# विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत यश

## २ सुवर्ण आणि ४ रौप्य पदकांची केली कमाई

। नेरळ । वार्ताहर ।

युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडिया यांच्या वतीने एस. जे. टी. इंटरनॅशनल स्कूल, कळंबोली येथे जिल्हास्तरीय कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नेरळ येथील नालंदा अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत चषक, सन्मानचिन्ह, २ सुवर्ण आणि ४ रौप्य पदकांची कमाई करत घवघवीत यश संपादन केले.




या उल्लेखनीय यशाबद्दल नेरळ परिसरासह संपूर्ण कर्जत तालुक्यात नालंदा अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या प्रशिक्षकांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या स्पर्धेत नेरळ येथील फेलिसिया डिसूझा, अभय फडतरे, पार्थ मोरे, सोहम भोईर, एल्विस रॉड्रिक्स व शाफिया खान या विद्यार्थ्यांनी सहभाग घेत आपल्या कौशल्याने आणि धाडसी प्रदर्शनाने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले.

प्रशिक्षक अविनाश जाधव आणि जीवन धाकवाल यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, विद्यार्थ्यांनी दाखवलेली मेहनत, आत्मविश्वास व खेळाडूवृत्ती यामुळे नालंदा अकॅडमीचा नावलौकिक अधिक वाढला आहे. नेरळ पूर्व येथे अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या नालंदा अकॅडमीमध्ये कराटेसह डान्स, संगीत, स्विमिंग, योग क्लासेस घेतले जात असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर दिला जात आहे.

“शिक्षण तर सगळीकडे मिळू शकते, पण आम्ही विद्यार्थ्यांना सर्वप्रथम आत्मविश्वास, शिस्त आणि जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची ताकद शिकवतो. आज विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश त्याच प्रयत्नांचे फलित आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांकडून अशीच उज्वल कामगिरी होणार यात शंका नाही.”

– अविनाश एम. जाधव
प्रशिक्षक, नालंदा अकॅडमी, नेरळ

### १६ डिसेंबरपासून ‘सिडको ओपन २०२५’

# आंतरराष्ट्रीय गोल्फ स्पर्धेला सुरुवात

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

सिडको आणि प्रोफेशनल गोल्फ टूर ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच लार्सन अँड टुब्रो प्रस्तुत, सिडको ओपन २०२५ या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गोल्फ स्पर्धेचे आयोजन १६ ते १९ डिसेंबर २०२५ या कालावधीत नवी मुंबईतील खारघर व्हॅली गोल्फ कोर्स येथे करण्यात आले आहे.

या स्पर्धेत देश-विदेशातील एकूण १२६ व्यावसायिक गोल्फपटू सहभागी होणार असून स्पर्धा स्ट्रोक-प्ले फॉरमॅटमध्ये खेळवण्यात येणार आहे. चार फेऱ्यांत १८ होल्सचे सामने होतील. पहिल्या दोन फेऱ्यांनंतर अव्वल ५० खेळाडूंना पुढील फेरीत प्रवेश दिला जाणार आहे.

या स्पर्धेत भारतातील युवराज संधू, अर्जुन प्रसाद, मनु गंडास, अंगद चीमा, खलीन जोशी, ओमप्रकाश चौहान यांच्यासह श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ, अमेरिका, इटली, झेक प्रजासत्ताक, युगांडा आदी देशांतील नामवंत परदेशी खेळाडू सहभागी होणार आहेत. नवी मुंबईतील मनोज कुमार, मयूर ठाकूर, पंकज ठाकूर तसेच मुंबईचे अनिल बजरंग माने हे स्थानिक खेळाडूही स्पर्धेत मैदानात उतरणार आहेत.

सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सांगितले की, ही आंतरराष्ट्रीय गोल्फ स्पर्धा भारतातील गोल्फ खेळाला चालना देणारी ठरेल.



# आदिवासी खेळाडूंसाठी सिझन बॉल क्रिकेट अकॅडमीचा शुभारंभ

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील आदिवासी खेळाडूंना सिझन बॉल क्रिकेटमध्ये संधी मिळावी यासाठी केपीएच क्रिकेट अकॅडमीचा शुभारंभ करण्यात आला आहे.

या अकॅडमी मध्ये निवासी प्रशिक्षण देखील दिले जाणार असून मुंबई क्रिकेट असोसिएशनचे कोच यांचे तरुण खेळाडूंना मार्गदर्शन लाभणार आहे.

कर्जत तालुक्यामध्ये कशेळे खांडस रस्त्यावर असलेल्या जांभूळवाडी येथे केपीएच क्रिकेट अकॅडमीचे उद्घाटन करण्यात आले.कांता पादीर आणि सचिन लांघी यांच्या माध्यमातून जांभूळवाडी येथे ३६० डिग्री मध्ये हे मैदान बनवण्यात आलेले आहे. या क्रिकेट अकॅडमीमध्ये ग्रामीण आणि आदिवासी मुले व मुली यांनी या ठिकाणी येऊन प्रशिक्षण घेऊ शकतात.

अकॅडमीचे शुभारंभ आणि त्यांनी या मैदानावर १४ वर्षीय मुलांचे कसोटीचे सामना आयोजित करण्यात आले होते.४५ - ४५ षटके यांचा हा सामना पनवेल मधील प्रतीक स्पोर्ट अकॅडमी आणि साईनाथ स्पोर्टस अकॅडमी ऐरोली या दोन संघांमध्ये झाला.

या क्रिकेट अकॅडमीतील एकूण २८ मुलांनी सहभाग निश्चित केला आहे. हे सामने दोन दिवसीय खेळवण्यात आले.

# तिलकने विराटला टाकले मागे

**धरमशाला :** तिसऱ्या टी-२० सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा सात विकेट्सने पराभव करत मालिकेत २-१ अशी महत्त्वाची आघाडी घेतली आहे. या सामन्यात तिलकच्या नावावर विक्रमाची नोंद झाली. तिलक वर्माने संयमी पण निर्णायक फलंदाजी करत नाबाद २५ धावा केल्या, ज्यात तीन चौकारांचा समावेश होता. या विजयात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या तिलक वर्माच्या नावावर आता एका नव्या विक्रमाची नोंद झाली आहे. या सामन्यातील नाबाद २५ धावांच्या खेळीसह त्याने टी-२० क्रिकेटमध्ये ४,००० धावा पूर्ण केल्या.या कामगिरीसह तिलकने विराट आणि शुभमन यांना मागे टाकले आहे. तिलक वर्माने केवळ १२५ व्या डावात हा टप्पा गाठून, टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात जलद ४,००० धावा पूर्ण करणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत तिसरे स्थान पटकावले आहे.

# शालेय ‘जंपरोप’ स्पर्धा यशस्वीपणे संपन्न

। रायगड । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालयांतर्गत जिल्हा क्रीडा परिषद रायगड, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड व जंप रोप असोसिएशन ऑफ रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हास्तरीय शालेय जंपरोप स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा रायगड जिल्ह्यातील नवी मुंबई उलवे येथे प्रथमच आयोजित करण्यात आल्याने जिल्हाभरातील क्रीडाप्रेमींमध्ये उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले होते.



स्पर्धेचा उद्घाटन समारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी पियुष म्हात्रे, रोशनी डिमेलो, प्रशांत पारगावकर विदेश मोरे, ललिता सिंग, वैभव पेटकर, प्रणित महाडी, मनीषा घोलप, करण बागल, दीपक बागल आदी मान्यवर उपस्थित होते.

ही एकदिवसीय स्पर्धा सेक्टर १९ येथील ब्राईट फ्युचर हायस्कूलच्या प्रांगणात पार पडली. रायगड जिल्ह्यातील विविध शाळांमधील अनेक खेळाडूंनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अनेकांसाठी जंपरोप हा स्वतंत्र क्रीडा प्रकार असल्याची ही पहिलीच ओळख ठरली.

स्पर्धेपूर्वी प्रशांत पारगावकर यांनी खेळाडूंना जंपरोप खेळाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले तसेच स्पर्धेच्या तांत्रिक बाबी त्यांनी समर्थपणे सांभाळल्या. त्यांच्या प्रोत्साहनामुळे खेळाडू व मार्गदर्शकांनी आभार व्यक्त केले.

स्पर्धेच्या आयोजनात प्रितेश पाटील, निकिता खारकर, रोशनी डिमेलो, अजय काकडे व सुवर्णा काकडे यांनी विशेष परिश्रम घेतले. उद्घाटनप्रसंगी मान्यवरांनी आयोजकांचे कौतुक करत या खेळाच्या विकासासाठी नेहमी पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले.

ब्राईट फ्युचर स्कूलचे ट्रस्टी म्हात्रे यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. तसेच फेन्सिंग असोसिएशन ऑफ रायगडचे सचिव मिलिंद ठाकूर यांनी जंपरोप खेळाचे भविष्य उज्वल असल्याचे सांगत रायगड जिल्हा व मुंबई विभागात या खेळासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी ज्ञानेश्वर मिरकुटे, मनीषा मिरकुटे, रिचल डिमेलो पाटील आदींनी परिश्रम घेतले. संपूर्ण स्पर्धेसाठी क्रीडा अधिकारी देविदास पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. सायंकाळी उशिरा या स्पर्धेचा समारोप करण्यात आला.

### पाकिस्तानचा ९० धावांनी उडवला धुव्वा | विजयाची ५ वर्षांची प्रतीक्षा संपवली

# टीम इंडियाचा सलग दुसरा विजय

। दुबई । वृत्तसंस्था ।

टीम इंडियाने अंडर १९ वनडे आशिया कप २०२५ स्पर्धेत सलग दुसरा विजय मिळवला आहे. टीम इंडियाने यूएईनंतर कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा धुव्वा उडवला आहे. टीम इंडियाने दुबईतील आयसीसी एकेडमी ग्राउंडवर आयुष म्हात्रे याच्या नेतृत्वात पाकिस्तानला ९० धावांनी पराभवाची धुळ चारली आहे.



टीम इंडियाने पाकिस्तानसमोर २४१ धावांचं आव्हान ठेवलं होतं. त्यानंतर पाकिस्तानच्या फलंदाजांनी टीम इंडियाच्या गोलंदाजांसमोर गुडघे टेकले. पाकिस्तानला पूर्ण ४९ ओव्हरही खेळता आलं नाही. भारतीय गोलंदाजांनी धारदार बॉलिंगच्या जोरावर पाकिस्तानला ४१.२ ओव्हरमध्ये १५० रन्सवर गुंडाळलं. भारताने अशाप्रकारे सलग दुसरा विजय साकारला.

विजयी धावांचा पाठलाग करणाऱ्या पाकिस्तानकडून फक्त तिघांनाच दुहेरी आकडा गाठता आला. पाकिस्तानसाठी हुजेफा अहसान याने सर्वाधिक ७० धावा केल्या. अहसानने या खेळीत २ षटकार आणि ९ चौकार लगावले. कॅप्टन फरहान युसफ याने २३ धावांचं योगदान दिलं. तर ओपनर उस्मान खान याने १६ धावा जोडल्या. त्या व्यतिरिक्त एकालाही दुहेरी आकड्यापर्यंत पोहचता आलं नाही. टीम इंडियासाठी दीपेश देवेंद्रन आणि कनिष्क चौहान या दोघांनी प्रत्येकी ३-३ विकेट्स घेतल्या. किशन कुमार सिंह याने २ फलंदाजांना मैदानाबाहेर रस्ता दाखवला. तर खिलान पटेल आणि वैभव सूर्यवंशी या दोघांनी प्रत्येकी १-१ विकेट घेत पाकिस्तानचं पॅकअप करण्यात योगदान दिलं.

त्याआधी पाकिस्तानने टॉस जिंकून टीम इंडियाला बॅटिंगसाठी भाग पाडलं. टीम इंडियाच्या आयुष म्हात्रे आणि वैभव सूर्यवंशी या स्टार जोडीने निराशा केली. वैभव ५ धावांवर बाद झाला. तर आयुष मोठी खेळी करण्यात अपयशी ठरला. आयुषने ३९ धावांचं योगदान दिलं.

टीम इंडियासाठी या सामन्यात एरॉन जॉर्ज आणि कनिष्क चौहान जोडीने सर्वाधिक धावा केल्या. एरॉनने ८५ तर कनिष्कने ४६ धावांचं योगदान दिलं. अभिग्यान याने २२ धावा केल्या. तर विहान मल्होत्रा आणि हेनिल पटेल या दोघांनी प्रत्येकी १२-१२ धावा केल्या. त्यामुळे टीम इंडियाला २४० धावांपर्यंत पोहचता आलं. मात्र टीम इंडियालाही ४९ ओव्हर खेळता आलं नाही. पाकिस्तानने टीम इंडियाला ४६.१ ओव्हरमध्ये ऑलआऊट केलं. पावसामुळे हा सामना ४९ ओव्हरचा करण्यात आला होता.

दरम्यान टीम इंडियाने या विजयासह पाकिस्तानचा हिशोब केला. पाकिस्तानने गेल्या वर्षी अंडर १९ आशिया कप स्पर्धेतच पराभूत केलं होतं. भारताने या पराभवाची परतफेड केली. तसेच टीम इंडियाने या विजयासह ५ वर्षांची प्रतिक्षा संपवली.

## निवडक

### फुटबॉलचा देव वानखेडे स्टेडियममध्ये

**मुंबई :** अर्जेंटिनाला आपल्या नेतृत्वात वर्ल्ड कप जिंकून देणारा दिग्गज आणि स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी हा ३ दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहे. मेस्सीने भारत दौऱ्याची सुरुवात कोलकातातून केली. मेस्सीने कोलकातात आपल्या पुतळ्याचं व्हर्च्युअल उद्घाटन केलं. मेस्सीचं मुंबईतील वानखेडे स्टेडियममध्ये चाहत्यांकडून जोरदार स्वागत करण्यात आलं आहे. मेस्सीची एक झलक पाहण्यासाठी फुटबॉल चाहत्यांनी स्टेडियममध्ये आणि आसपासच्या परिसरात तोबा गर्दी केली आहे. तसेच स्वागतानंतर लिओनेल मेस्सी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रोजेक्ट महादेवाचं उद्घाटन करण्यात आलं आहे. मेस्सीची चाहते गेल्या तासाभरापासून वाट पाहत होते. मेस्सीची वानखेडे स्टेडियममध्ये एन्ट्री झाली. फुटबॉलचा देव क्रिकेटच्या पंढरीत येताच चाहत्यांनी मेस्सी मेस्सी, असा जयघोष करत स्टेडियम दणाणून सोडला. त्यानंतर मेस्सी आणि टीम इंडियाचा दिग्गज फुटबॉलर सुनील छेत्री यांनी एकमेकांची भेट घेतली. मेस्सी आणि सुनील या दोघांनी एकमेकांना मिठी मारली.



### चिल्हे येथे क्रीडा महोत्सव

**खांब :** रोहे तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथे क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात व आनंददायी वातावरणात संपन्न करण्यात आला. संस्थेचे चेअरमन महेंद्र पोटफोडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या क्रीडा स्पर्धेत संचालक धनाजी लोखंडे यांच्या हस्ते क्रीडाज्योतीचे प्रज्वलन करून व श्रीफळ वाढवून या महोत्सवास प्रारंभ करण्यात आला.यावेळी मुख्याध्यापक दिपक जगताप व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग आदी प्रमुख मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. तर शालेय समितीचे अध्यक्ष व संस्थेचे संचालक राम मरवडे यांनीही या महोत्सवात भेट देऊन विद्यार्थी वर्गाला क्रीडाविषयक मार्गदर्शन केले व सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या महोत्सवातंर्गत विद्यार्थी वर्गाच्या सांघिक तसेच वैयक्तिक खेळांच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. शेवटच्या सत्रात विविध फनीगेम्स घेऊन महोत्सवाची सांगता झाली.

### सर्वेश थळे याची अभिमानस्पद कामगिरी

**खांब :** रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील आर्चरी प्रशिक्षित खेळाडू व राठी हायस्कूलचा अष्टपैलू माजी विद्यार्थी म्हणून नावलौकिक प्राप्त केलेल्या आर्चरी खेळाडू सर्वेश थळे याची इंडिया गॉट्स टॅलेंटमध्ये अभिमानस्पद कामगिरी केली आहे. सध्या येथील पनवेल येथील द्रोणा आर्चरी अकॅडमीचा उत्कृष्ट खेळाडू म्हणून नावलौकिक मिळवित असलेल्या सर्वेश थळे याची सुप्रसिद्ध सोनी लिव चॅनेल वरील सुप्रसिद्ध इंडिया गॉट्स टॅलेंट ११ या सुप्रसिद्ध शोमध्ये निवड झाली आहे. त्याने यामध्ये आपले सर्वोत्कृष्ट सादरीकरण करून अभिमानास्पद कामगिरी केली आहे. सर्वेश थळे हा मूळचा कुर्डुस येथील सुपुत्र असून त्याने रोहा येथे विशाल कदम वा पनवेल येथे मुकेश गुरदाळे यांच्याजवळ प्रशिक्षण घेतले आहे.मुकेश गुरदाळे यांनी सर्वेशच्या उत्तमोत्तम कामगिरीसाठी प्रचंड मेहनत घेऊन सर्वच बाबतीत यशस्वी केले आहे.सर्वेशच्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन व्यक्त होताना दिसत आहे.





### अर्णव सलागरे याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**खांब :** रोह्याचा सुपुत्र व कराटे चॅम्पियन कु.अर्णव सलागरे याची कराटे या स्पर्धेसाठी राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. नुकत्याच मुबई येथे संपन्न झालेल्या तिसऱ्या महाराष्ट्र गोजिर्यु स्टेट सिलेक्शन स्पर्धेत रोहा येथील झेन मर्शिअल आर्ट स्कूलचा विद्यार्थी अर्णव अमर सलागरे याने कराटेच्या कुमिते या प्रकारात गोल्ड मेडल व काता या प्रकारात ब्राँझ मेडल पटकावले असून त्याची नॅशनल कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे. अर्णवच्या या यशात त्याचे मार्गदर्शक व प्रशिक्षक निलेश मनोहर व प्रमोद भगत यांचा सिंहाचा वाटा आहे.अर्णव याने आतापर्यंत कराटे स्पर्धेत खुप मोठ्या प्रमाणात पारितोषिकं मिळविली असून त्याने तालुक्यासह रायगड जिल्ह्याचेही नाव त्याने रोशन केले आहे. त्याच्या राष्ट्रीय स्पर्धेतील निवडबद्दल समाजातील सर्वच स्तरातून अभिनंदन व्यक्त होताना दिसत आहे.

### डॉक्टर्स लीगमध्ये महाड डॉक्टर्स विजयी

**महाड :** रायगड मेडिकल असोसिएशन डॉक्टर्स प्रीमियर लीग आयपीसीएल नागोठणे येथे संपन्न झाल्या. महाड क्रिकेट टीमने आपला दबदबा कायम राखत फायनलमध्ये बलाढ्य अशा पनवेल संघाचा पराभव करून सात वर्षानंतर या ट्रॉफीवर आपले नाव कोरले आहे. डॉ. जितेंद्र पावरा यांनी प्रत्येक सामन्यामध्ये वादळी खेळी करून उत्तुंग षटकार चौकार लगावत महाड क्रिकेट टीमला हे विजेते पद मिळवून दिले. फायनल मॅचमध्ये कर्णधार डॉक्टर राहुल वारंगे यांनी नाणेफेक जिंकून फिल्डिंग करण्याचा निर्णय घेतला पनवेल संघाला चार षटकांमध्ये ४६ धावा करता आल्या प्रतिउत्तर दाखल खेळताना महाड संघाची स्फोटक जोडी मैदानात उतरत दोघांनी पण चौकार षटकारांच्या अतिश बाजी केली. डॉ.जितेंद्र पावरा यांनी एका ओव्हरमध्ये पाच षटकार खेचत महाड संघाला विजेतेपद मिळवून दिले. जवळपास तीन मॅचमध्ये त्यांना मॅन ऑफ द मॅच आणि फायनल मॅचमध्ये सुद्धा मॅन ऑफ द मॅच, आणि मॅन ऑफ द सिरीज, बेस्ट बॅट्समन म्हणून गौरवण्यात आले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)